# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**शुक्रवार, दिनांक २७ फेब्रुवारी, २०२६ / फाल्गुन ८, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | वने मंत्री | |
| (३) | आदिवासी विकास मंत्री | |
| (४) | कृषी मंत्री | |
| (५) | सामाजिक न्याय मंत्री | |
| (६) | रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री | |
| (७) | मदत व पुनर्वसन मंत्री | |
| (८) | मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राच्या बफर झोन विस्तार निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत

**(१) * ६६४४ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महसूल व वन विभागाच्या दिनांक २४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचा बफर झोन विस्तार करण्यात येणार असून, त्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव तालुक्यातील कोहमारा, भीतीखिडकी, झाशीनगर-गोटणगाव यांसारख्या परिसरातील स्थानिक नागरिकांच्या विहीर खोदणे, शेततळी, रस्ते बांधणी आणि गुरे चराई इ.पारंपारिक हक्कांवर निर्बंध येणार असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शासन निर्णयामध्ये बफर झोनमध्ये समाविष्ट होणाऱ्या क्षेत्राचे स्पष्ट नकाशे, क्षेत्रफळ आणि गावनिहाय माहितीचा अभाव असल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे व तणावाचे वातावरण निर्माण झाले असून स्थानिक ग्रामपंचायतींना विश्वासात न घेता आणि जनभावनेचा विचार न करता घेतलेल्या या निर्णयामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर आणि उपजीविकेवर परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करून चौकशीच्या अनुषंगाने सदर निर्णयाचा फेरविचार करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.गणेश नाईक :** (१) व (२) हे खरे नाही.

दिनांक ०७/०९/२०१६ च्या शासन अधिसुचनेन्वये गोंदिया प्रादेशिक, गोंदिया एफ.डी.सी.एम., भंडारा एफ.डी.सी.एम. व वन्यजीव गोंदिया यांचेकडील १२४१२७.३७ हे. क्षेत्र नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे बफर क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

व्याघ्र प्रकल्प एकसंघ नियंत्रणाखाली आणण्याबाबत राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरण, पर्यावरण व हवामान बदल मंत्रालय, केंद्र शासन, नवी दिल्ली यांनी दिनांक १५/०२/२०१२ च्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत. त्यानुसार राज्य वन्यजीव मंडळाची दिनांक १२/०८/२०२४ रोजी आयोजित २३ व्या बैठकीत मा.मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष राज्य वन्यजीव मंडळ यांनी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

"नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्पाच्या एकसंघ नियंत्रणाच्या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करावी, असे निर्देश माननीय अध्यक्षांनी दिलेले आहेत."

सदर क्षेत्र वन्यजीव व्यवस्थापन, संरक्षण व संवर्धन अधिक प्रभावी व परिणामकारक होण्याच्या दृष्टीने दिनांक २६/१२/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये उप वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, नवेगाव-नागझिरा व्याघ्र प्रकल्प, गोंदिया यांच्या एक संघ नियंत्रणाखाली आणण्यात आले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात चंद्रपुरसह इतर जिल्ह्यांतील वन्यप्राण्यांचे हल्ले रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२) * ७५७९ श्री.संदीप जोशी, श्री.प्रविण दरेकर, श्री.संजय केणेकर, श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सचिन अहिर, श्री.हेमंत पाटील, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यात सन २०२५ मध्ये वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात सुमारे ४७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून, बिबट्यांच्या हल्ल्यात पुणे जिल्ह्यातील जुन्नर वनविभागात ७ वर्षांत २७ व्यक्तींचा, हुडकेश्वर, नरसाळा परिसरात ९ महिन्याच्या मुलीचा, बोरगाव (ता.शिराळा,जि.सांगली) येथील सहा वर्षाच्या चिमुकल्याचा मृत्यू झाला असून, वन विभागाच्या नोंदणीनुसार मागील पाच वर्षात वाघांच्या हल्ल्यात २५० व्यक्तींचा, बिबट्यांच्या हल्ल्यात ८७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून बिबट्यांकडून झालेल्या मानवी हल्ल्यांपैकी ५० टक्के हल्ले हे लहान मुलांवर झाले असून रानडुक्कर, कोल्हे, अस्वल, लांडगा, माकड, वाघ व बिबटे यांच्या हल्ल्यामुळे दरवर्षी अनेक व्यक्तींचा मृत्यू होत असल्याची तसेच नायगाव (जि.नांदेड) तालुक्यातील विविध भागात बिबट्याचा वावर सुरु असून दोन व्यक्तींसह तीन जनावरांवर हल्ला केल्याचे तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील बाजार भोगाव (ता.पन्हाळा) व आजरा तालुक्यांतील गावामध्ये गव्यांच्या हल्ल्यामुळे शेत पिकांचे नुकसान होत असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ४४४ वाघांपैकी एकटया चंद्रपूर जिल्ह्यात २५० वाघ असून तेथे सिंचन प्रकल्पासह विविध विकासकामांमुळे जंगल कमी होत असून प्राण्यांची संख्या वाढत असल्याने जिल्ह्यात मागील तीन वर्षांत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात सर्वाधिक व्यक्तींचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी तालुक्याच्या पूर्व भागात व तिळापूर, वांजुळपोई, कोपरे, शेनवडगाव, मांजरी, वळण, मानोरी आदी गावांमध्ये बिबट्यांचा वावर वाढला असून दररोज विविध वस्त्यांवरील पाळीव कुत्रे, कोंबड्या, शेळया, बोकड, लहान वासरे इ.चा बिबट्यांचा हल्ल्यात मृत्य होत आहे तसेच शिराळा (जि.सांगली) तालुक्यात बिबट्या तसेच अन्य हिंस्र प्राण्यांचा वावर मोठ्या प्रमाणात वाढल्याने चांदोली अभयारण्याच्या परिसरातील व्यक्तींच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, चंद्रपूरसह इतर जिल्ह्यांतील वन्यप्राण्यांचे हल्ले थांबविण्यासाठी तेथील ग्रामपंचायतीला शस्त्र परवाना देऊन पिंजऱ्यांची संख्या वाढविण्यात यावी तसेच राज्यातील शेत-शिवारात नीलगाय, रानडुक्कर, कोल्हे, तरस, रानगवा, हत्ती, माकडे यांच्यामुळे शेतीचेही यापुढे नुकसान होऊ नये याकरीता आणि वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात बळी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना व नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने नुकसान भरपाई देण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली आहे तसेच वन्यप्राण्यांपासून मानवी जीविताचे व जनावरांचे संरक्षण करण्यासाठी वन विभागाने काय उपाययोजना केल्या आहेत व वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तींच्या वारसांना २५ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार किती जणांना अद्यापपर्यंत आर्थिक मदत करण्यात आली आहे व उर्वरितांना तात्काळ मदत करण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) मागील ५ वर्षात राज्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ४२० व्यक्तींचा मृत्यू झाला असून त्यापैकी २४८ व्यक्तीचा वाघाच्या हल्ल्यात व १०४ व्यक्तींचा बिबट्याच्या हल्ल्यात मृत्यू झाला आहे.

सन २०२५ मध्ये चंद्रपूर जिल्ह्यात वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात ४७ व्यक्तींचा मृत्यू झाला असून प्रचलित नियमातील तरतूदीनुसार मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसाना एकूण रुपये ८२७.०० लक्ष इतके अर्थसहाय्य अदा करण्यात आले आहे.

जुन्नर वनविभागात ७ वर्षात बिबट्याच्या हल्ल्यात २७ व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद आहे. त्यापैकी २६ प्रकरणी मृत व्यक्तींच्या कादेशीर वारसास रुपये ५५३.०० लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे. उर्वरित १ प्रकरणी मृत व्यक्तीच्या कायदेशीर वारसाचा दाखला प्राप्त होताच नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

तसेच नायगाव तालुक्यात वन्यप्राण्याच्या हल्ल्यात माहे जानेवारी, २०२६ मध्ये २ व्यक्तीं किरकोळ जखमी झाल्याचे निदर्शनास आले असून सदर व्यक्तींनी नुकसान भरपाईसाठी अर्ज न केल्यामुळे नुकसान भरपाई अदा करण्यात आलेली नाही. तसेच पशुधन हानीच्या १ प्रकरणामध्ये नुकसानग्रस्त पशुधनाच्या मालकास रुपये ०.१५ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(२) वन्यप्राणी गणनेनुसार राज्यात वाघांच्या एकूण संख्येपैकी २०० पेक्षा जास्त वाघ चंद्रपूर जिल्ह्यात आहेत.

सन २०२३ ते सन २०२५ या कालावधीत चंद्रपूर जिल्ह्यात वाघाच्या हल्यात ९१ व्यक्तींचा मृत्यू तर इतर वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात १० व्यक्तींचा मृत्यू झाल्याची नोंद आहे.

(३) राहुरी तालुक्याच्या पूर्व भागात व तिळापूर, वांजुळपोई, कोपरे, शेनवडगाव, मांजरी, वळण, मानोरी आदी गावांमध्ये सन २०२५-२६ (दिनांक १०/०२/२०२६ पर्यंत) वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २२ पशुधनाचा मृत्यू झाला असून संबंधित पशुधनाच्या मालकास प्रचलित नियमातील तरतूदीनुसार रुपये १.१९ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

तसेच शिराळा तालुक्यात सन २०२५-२६ (दिनांक १०/०२/२०२६ पर्यंत) बिबट व रानडुक्कर या वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात २ व्यक्ती जखमी व १ व्यक्तीचा मृत्यू झाला असून प्रचलित नियमातील तरतुदीनुसार रुपये ३०.०२ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

(४) महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

• नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याकरीता अर्थसंकल्प निधी वितरण प्रणालीवर २४०६ २३६६ या लेखाशिर्षांतर्गत उणे (-) प्राअधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

• मानव-वन्यजीव संघर्षावर आळा घालण्यासाठी क्षेत्रिय स्तरावर खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

• क्षेत्रिय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या गस्ती पथकांची निर्मिती करून नियमितपणे वनक्षेत्रात तसेच वन्यप्राणी प्रवण क्षेत्रात गस्त घालण्यात येवून वन्यप्राण्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात येते.

• मानवी जिवीतास धोकादायक ठरणाऱ्या वन्यप्राण्यांना वन्यजीव (संरक्षण) अधिनियम, १९७२ मधील तरतूदीनुसार जेरबंद करण्याची कार्यवाही करण्यात येते.

• राज्य शासनाने १५० बिबट्यांच्या नसबंदीचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर केला होता.त्यावर दिनांक १७/११/२०२५ रोजी प्रायोगिक तत्वावर जुन्नर वन वन विभागातील ५ मादा बिबट्यांना जेरबंद करुन नसबंदी करण्याची परवानगी केंद्र शासनाने दिली आहे. त्यानुसार शासनाकडून पुढील कार्यवाही करण्यात येत आहे. सदरचा अभ्यास सहा महिन्यात पूर्ण होण्याची अपेक्षा असून, त्यानुसार पुढील निर्णय घेण्यात येईल.

• वन्यप्राण्यांना वनक्षेत्रातच पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे याकरीता कृत्रिम पाणस्थळे, वनतळे, चेकडॅमची निर्मिती करून पाण्याची व्यवस्था करण्यात येते.

• स्थानिक पातळीवर संयुक्त वनव्यवस्थापन समित्या व अशासकीय संस्थांच्या मदतीने स्थानिकांचे प्रबोधन करण्यात येते तसेच सूचना फलक / भित्तीपत्रकाव्दारे नागरीकांनी घ्यावयाच्या दक्षतेबाबत माहिती देण्यात येते.

• आपत्कालीन परिस्थितीकरीता जलद बचाव पथकांची निर्मिती करण्यात आलेली आहे.

• नैसर्गिक भक्ष्य असलेल्या तृणभक्षी वन्यप्रण्यांना वनातच गवत / चारा उपलब्ध होण्याकरीता कुरण विकासाची कामे करण्यात येतात.

• वनालगतच्या गावांतील गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी व्हावे यासाठी डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन विकास योजना राबविण्यात येत येत आहे.

• हिंस्त्र प्राण्यांचे मानवांवरील हल्ले कमी करण्यासाठी आर्टिफिशल इंटेलिजन्स (AI) आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर काही ठिकाणी केला जात असून भविष्यात मोठ्या प्रमाणात वापर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील मा.बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन केंद्राच्या प्रकल्पास निधी उपलब्ध करून देण्याबाबत

**(३) * ६७१० श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कन्हेरगाव (ता.वसमत, जि.हिंगोली) शिवारात ६५ एकर क्षेत्रावर उभारण्यात येणारा बाळासाहेब ठाकरे हरिद्रा (हळद) संशोधन व प्रशिक्षण केंद्राचा बहुप्रतिक्षीत व महत्वाकांक्षी प्रकल्प निधी अभावी प्रलंबित असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पातील प्रयोगशाळा, हळद प्रक्रिया उद्योग, विकिरण (रेडिएशन) केंद्र, विद्युत उपकेंद्र उभारणी व विकेंद्रीकरण यांसारखी महत्वाची कामे करण्यासाठी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्ये ७०९.२७ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीला मंजूरी देण्यात आली असून, एक वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊनही अद्याप सदर प्रकल्पासाठी प्रत्यक्षात निधी प्राप्त झालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदर महत्वकांक्षी प्रकल्पाचे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी त्वरीत निधी उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकल्पासाठी सन २०२२ पासुन आतापर्यंत एकुण रु. ८७.४६ कोटी उपलब्ध करुन देण्यात आले आहे. त्यापैकी रक्कम रु.८१.८० कोटी खर्च झालेला आहे.

(२) अंशत: खरे आहे.

सदर प्रकल्पासाठी सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरिता रक्कम रु. २८.०० कोटी अर्थसंकल्पित असून रु.१८.६० कोटी निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच सन २०२५-२६ साठी रक्कम रु.१००.०० कोटीचा पुरवणी मागणीचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे.

(३) या प्रकल्पासाठी आवश्यक निधी अर्थसंकल्पित करण्यासाठी सन २०२६-२७ साठी आवश्यक निधीची मागणी करण्यात आली आहे.

प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम विदर्भातील ५ जिल्ह्यांमध्ये दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(४) * ७७०५ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पश्चिम विदर्भातील पाचही जिल्ह्यांतील एकूण ७०३४ गावांची अंतिम पैसेवारी नुकतीच जाहीर झाली असून, सदर पैसेवारी ४७ पैसे असून ५० पैसे पेक्षा कमी असल्याने खरीप हंगामाची दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पश्चिम विदर्भातील अमरावती विभागातील एकूण ७ हजार ३४ गावांना दुष्काळाच्या सर्व सेवा तातडीने देण्यासाठी आणि विद्यार्थ्यांचे शैक्षणिक शुल्क माफ करुन नागरिकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याबाबत दुष्काळ सदृश्य उपाययोजना करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) :** (१) होय

(२) दुष्काळ व्यवस्थापन संहिता २०१६ व दुष्काळ जाहीर करण्याच्या अनुषंगाने शासनाचे प्रचलित धोरण विचारात घेवून कार्यवाही सुरू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे वेरुळ (जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय जमिनीच्या खरेदी-विक्रीतील गैरव्यवहाराची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याबाबत

**(५) * ६६६४ श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे वेरुळ (ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर) येथील शासकीय जमीन गट नं. ६७७, ६८८, ६८९ व ६९० ह्या वर्ग २ च्या जमिनी मागासवर्गीय कुटुंबांना सनदीद्वारे वाटप करण्यात आल्या असून, सदर जमिनी सन २०१२ मध्ये प्रादेशिक योजनेच्या आराखड्यात जलस्त्रोत, वाहनतळ व वाणिज्य वापरासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर राखीव जमिनी वर्ग २ च्या असूनही प्रशासकीय अधिकारी व नामांकित व्यावसायिकांनी बेकायदेशीररित्या खरेदी-विक्री करुन या जागेवर हॉटेल, रेस्टॉरंट व व्यावसायिक इमारतींची बांधकामे केली असून याबाबत स्थानिकांनी केलेल्या तक्रारीनुसार प्रशासनाने स्थळ पाहणी करुन सादर केलेल्या अहवालावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदर जमिनीचा बेकायदेशीर व्यवहार करणाऱ्यांवर कारवाई करुन जमीन शासनाकडे जमा करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) मौजे वेरुळ, ता.खुलताबाद, जि.छत्रपती संभाजीनगर येथील जमीन गट क्रमांक ६८७,६८८,६८९ व ६९० ह्या स्थानिकांना लागवडीसाठी दिल्याचे १९५० पूर्वीच्या अभिलेखावरुन दिसून येते.

महानगर नियोजनकार, महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगर यांचे अभिप्रायानुसार गट क्रमांक ६८८,६८९ व ६९० हे भागश: विदयमान जलस्त्रोत व भागश: वाहनतळ यामध्ये समाविष्ट असून गट क्र.६८७ हा पर्यटन विकास क्षेत्र यामध्ये समाविष्ट आहे.

(२), (३) व (४) जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडे प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तहसिलदार, खुलताबाद यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला असून तपासणी सुरु आहे. त्यानंतर पुढील उचित कार्यवाही जिल्हाधिकारी, छत्रपती संभाजीनगर यांच्याकडुन करण्यात येत आहे.

-----------------

## अकोला जिल्ह्यातील सेतू व आधार केंद्र वाटप प्रक्रियेतील अनियमिततेची चौकशी करण्याबाबत

**(६) * ७५०० श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या दिनांक १९ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयानुसार महानगरपालिका व नगरपरिषद क्षेत्रात १०००० लोकसंख्येसाठी १ आपले सरकार सेवा केंद्र देण्याबाबतची बाब नमूद असताना अकोला जिल्ह्यातील प्रभागात २० ते २५ हजार लोकसंख्या असताना ६ सेतू केंद्राचे वाटप करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, अकोला यांनी दिनांक २८ जानेवारी, २०२१ रोजी जाहिरात देवून अंतिम यादी दिनांक २६ ऑक्टोबर, २०२१ रोजी तयार केली, परंतु जिल्हाधिकारी, अकोला यांचे परवानगीविना निवासी उपजिल्हाधिकारी, (RDC) अकोला यांचेशी संगनमत करून संबंधित २१ लोकांची यादी पत्र क्र. RNo-DPMWS-१११०/२०२१, दिनांक १६ मार्च, २०२१ अन्वये मुख्य कार्यपालन अधिकारी ऑनलाईन मर्या. मुंबई यांना पाठविली असून, सदर सेतू केंद्रांचे वाटप जाहिरात न देता केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जिल्हाधिकारी, अकोला यांच्याकडील १०० आधार संचामधील काही संच चोरीला गेल्याची प्रशासनाने पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे काय, तसेच एक घर एक सेतू आधार संच असे नियमात नमूद असताना एकाच घरामध्ये दोन संच दिल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती काय आढळून आले आहे, व त्यानुषंगाने संबंधितांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) शासन निर्णय दिनांक १९/०१/२०१८ नुसार २०११ च्या लोकसंख्येनुसार बृहन्मुंबई महानगरपालिका वगळता इतर महानगरपालिका क्षेत्रासाठी १०००० लोकसंख्येकरीता १ आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्याची तरतूद आहे. अकोला महानगरपालिकेची सन २०११ नुसार लोकसंख्या ४,२५,८१७ इतकी असून सद्दस्थितीत अकोला महानगरपालिकेंतर्गत १०८ आपले सरकार केंद्र मंजूर आहेत, हे खरे आहे.

(२) निवासी उपजिल्हाधिकारी, अकोला यांनी जिल्हाधिकारी, अकोला यांच्या मान्यतेने दिनांक १६ मार्च, २०२१ च्या पत्रान्वये २१ पात्र अर्जदारांची यादी मुख्य कार्यपालन अधिकारी, महा ऑनलाईन मर्या. मुंबई यांना पाठविली आहे हे खरे आहे.

(३) व (४) अंशतः खरे आहे.

१०० आधार संचामधील काही संच चोरीला गेल्याची पोलिसाकडे तक्रार दाखल केल्याबाबत नोंद नाही. जिल्हाधिकारी कार्यालय अकोला मार्फत आधार केंद्राकरीता दिनांक २८/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरीतीमध्ये आधार केंद्र मंजूर असलेले कुटुंब दुसरे आधार केंद्र मिळण्यास पात्र ठरणार नाही, असे नमूद करण्यात आले होते. तथापि, एक ठिकाणी एका कुटुंबास दुसऱ्या आधार केंद्रासाठी निवड झाली असल्याचे निदर्शनास आले आहे. सदरचे आधार केंद्र अद्याप वाटप करण्यात आलेले नाही. सदर निवड करण्यात आलेले दुसरे आधार केंद्र रद्द करण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, अकोला यांच्यास्तरावर सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्ह्यातील नदीपात्रांतून होणारा अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(७) * ७३७० श्री.एकनाथराव खडसे : तारांकित प्रश्न क्रमांक २८९ ला दिनांक १० मार्च, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमळनेर, मुक्ताईनगर तसेच एरंडोल (जि.जळगांव) तालुक्यात अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक सुरु असल्याचे निदर्शनास आले असून जळगाव तालुक्यातील गिरणा नदीपात्रातून सुमारे ४ हजार ब्रास अवैध वाळूचा साठा जप्त करण्याची कारवाई दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुक्ताईनगर (जि.जळगांव) तालुक्यातील कुऱ्हा परिसरात पूर्णा नदी पात्रातून मशिनद्वारे अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक होत असल्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२५, १६ डिसेंबर, २०२५ आणि १९ जानेवारी, २०२६ रोजी मा.महसूल मंत्री, मा.विभागीय आयुक्त, नाशिक, विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक, जिल्हाधिकारी, जळगांव, पोलीस अधीक्षक, जळगांव आणि उपविभागीय अधिकारी, भुसावळ यांच्याकडे वारंवार पत्रव्यवहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील अवैधरित्या वाळू उपसा व वाहतूक सुरु असून ते रोखण्यासाठी गेलेल्या तहसीलदार यांचेसह महसूल विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांचेवर व ग्रामस्थांवर वाळू माफियांकडून प्राणघातक हल्ले करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, जळगाव जिल्ह्यात मागील दोन वर्षांपासून वाळू गटांचे लिलाव झाले नसल्याने तसेच अवैधरित्या वाळू वाहतुकीतून अधिक आर्थिक फायदा होत असल्याने वाळू ठेकेदारांकडून जिल्हा प्रशासनाच्या वाळू ठेक्याच्या लिलावास प्रतिसाद दिला जात नाही, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, जळगाव जिल्ह्यातील उपरोक्त कारवाई दरम्यान जप्त केलेल्या वाळू साठ्याचा लिलाव करण्यात आला आहे काय, त्यातून शासनास किती महसूल प्राप्त झाला आहे,

(६) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करून जिल्ह्यात अवैधरित्या वाळू विक्री रोखण्याकरीता तसेच प्राणघातक हल्ले करणाऱ्या ठेकेदार/वाळू माफिया यांना अटक करून तसेच त्यांच्यावर गुन्हे दाखल करुन कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) असल्यास, शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणे गंभीर गुन्हा असल्याने, महसूल कर्मचाऱ्यांवरील हल्ले रोखून दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याबाबत शासनाकडून कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (**१) जळगाव तालुक्यातील मौजे धानोरा बु.ता.जळगाव येथील नदीपात्राजवळुन दिनांक १४/११/२०२५ रोजी २३२८ ब्रास वाळूसाठा जप्त करुन लिलाव करण्यात आला आहे.

तसेच अमळनेर, मुक्ताईनगर व एरंडोल या तालुक्यात अनुक्रमे २९ ब्रास, ११ ब्रास व ३१७.२७ ब्रास वाळू साठा जप्त करण्यात आला आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) जळगाव जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०२५ ते दिनांक ३१/०१/२०२६ या कालावधीत ८ शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांच्यावर हल्ले झाले आहेत

(४) हे खरे नाही.

सन २०२३-२४ मध्ये जळगाव जिल्ह्यातील ०४ गाळमिश्रीत वाळूगटांच्या निविदा झाल्या आहेत.तसेच, सन २०२५-२६ मध्ये पर्यावरण अनुमती प्राप्त १४ वाळूगटापैकी १३ वाळूगटांचा यशस्वी लिलाव झालेला आहे.

(५) दिनांक १/०१/२०२४ ते दिनांक १२/०२/२०२६ या कालावधीत एकूण ६८१८.२७ ब्रास वाळू साठा जप्त करण्यात आला असून जप्त वाळूसाठ्यापैकी ४०३९ ब्रास जप्त वाळूसाठ्याचा लिलाव करण्यात आला असून त्यामधून रुपये ६०,४९,९३३/- एवढा महसूल शासनास प्राप्त झालेला आहे.

(६) व (७) वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक प्रकरणी विविध कायदे/अधिनियम/नियम यान्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक १७/०७/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार क्षेत्रियस्तरावर कार्यवाही करण्यात येते.

दिनांक १/०४/२०२५ ते दिनांक ३१/०१/२०२६ या कालावधीत जळगाव जिल्यात ५८१ अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूक प्रकरणी रुपये ७,५६,७०,०००/- इतका दंड आकारला असून एकूण ४८ गुन्हे दाखल करुन १९ आरोपींना अटक करण्यात आली आहे.

-----------------

## मराठवाड्यातील वनजमिनीचे वनेतर कामांसाठी नियमबाह्य पध्दतीने परस्पर वाटप केल्याबाबत

**(८) * ६९५६ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यातील सुमारे १४ हजार हेक्टर वनजमिनीचे वनेतर कामांसाठी परस्पर वाटप करण्यात आले असून यासाठी केंद्र शासनाची आवश्यक पूर्वमंजुरी घेतलेली नसल्याचे तसेच वनसंरक्षण कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे नुकतेच निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने नांदेड जिल्ह्यासह मराठवाड्यात सुमारे १४ हजार हेक्टर वनजमिनीचे वनेतर (डायव्हर्जन) कामांसाठी परस्पर वाटप केल्याप्रकरणी दोषी आढळून आलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक : (**१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

नांदेड वन विभागांतर्गत १३२४२९.४३१ हे. वनक्षेत्र असून, त्यापैकी वन (संरक्षण व संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत केंद्र शासनाची परवानगी घेऊन विविध एकूण १४ प्रकल्पासांठी १६१.१८ हे. वनक्षेत्र वळती करण्यात आलेले आहे. तसेच, अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वन हक्काची मान्यता) अधिनियम, २००६ च्या कलम ३ (२) अंतर्गत १४७ सार्वजनिक सुविधा प्रकल्पांसाठी ३४.६८७ हे. आर. वनक्षेत्र वळती करण्यात आलेले आहे.

तथापि, प्रस्तावित राखीव वन व अवर्गीकृत वन म्हणून नोंद असलेल्या १४०५०.९४६ हे. क्षेत्रापैकी महसूल विभागाकडून सन १९८० पुर्वी व नंतर ३१८१.०५३ हे. आर वनक्षेत्राचे पट्टे वाटप केलेले आहेत.

अशाप्रकारे महसूल विभागाकडून वाटप झालेल्या वनक्षेत्रासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १५/०५/२०२५ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरून शासन निर्णय दिनांक ०५/०९/२०२५ नुसार जिल्हाधिकारी यांच्यास्तरावर विशेष तपास पथक (SIT) गठीत करण्यात आली आहे. उक्त तपास पथकाकडून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्तुत क्षेत्राबाबत निर्णय घेण्यात येईल.

-----------------

## ताथवडे (ता.मुळशी, जि.पुणे) येथील पशुसंवर्धन विभागाच्या शासकीय जमिनीची बेकायदेशीररीत्या विक्री प्रकरणी झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याबाबत

**(९) * ७११५ श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ताथवडे (ता.मुळशी, जि.पुणे) येथील पशुसंवर्धन विभागाच्या मालकीच्या जमीन क्रमांक ३२ साठी खरेदी-विक्रीकरीता पूर्वपरवानगी आवश्यक असतानासुध्दा शासनाच्या परवानगीशिवाय जमिनीची खरेदी-विक्री करण्यात आली असून, हवेली क्र.१७ उपनोंदणी कार्यालयातील सहायक दुय्यम निबंधक व वरिष्ठ लिपिक यांच्याशी संगनमत करून संबंधित मालमत्तेचा खरेदीखत दस्त नोंदविण्यात आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनीचा मूळ मालक मृत असताना आणि वारसांची नोंद नसतानाही "तांत्रिक अडचण" दाखवून स्किप पर्यायाचा गैरवापर करून संबंधित विकासकाला चुकीच्या पध्दतीने जमिनीची दस्त नोंदणी करून देण्यात आली असल्याने अशाच प्रकारे इतर जिल्ह्यातही "स्किप" पर्याय व तांत्रिक त्रुटींचा वापर करून अनेक चुकीचे दस्त नोंदविले जात आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबंधित दोषी अधिकारी व विकासक यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) सह दुय्यम निबंधक हवेली क्र. १७ कार्यालयात दस्त क्र. ६८५/२५ हा दस्त सदर खरेदीखत नोंदणी करण्यापुर्वी या पक्षकारांमध्ये सदर मिळकतीचे साठेखत सह दुय्यम निबंधक हवेली क्र.२२ या कार्यालयात दस्त क्र.१७४४२/२०२३ वर दिनांक ०६/०८/२०२३ रोजी नोंदविण्यात आले आहे. त्यावेळी वार्षिक बाजारमुल्य तक्त्यानुसार मिळकतीचे बाजारमुल्य रुपये १६,६२,१६,०००/- इतके परिगणीत करण्यात आले आहे आणि सदर मुल्यांकन रुपये १६,६२,१६,०००/- व मोबदला रुपये ३३,००,००,०००/- यापैकी जास्त म्हणजेच रुपये ३३,००,००,०००/- इतक्या रक्कमेवर नियमानुसार रुपये २,३१,००,००/- इतके मुद्रांक शुल्क साठेखतावर आकारण्यात आले आहे. त्यामुळे खरेदीखताच्या दस्तऐवजास नियमानुसार रुपये ५००/- इतके मुद्रांक शुल्क लावण्यात आले आहे. त्यामुळे सदर खरेदीखताचा दस्त नोंदवितांना मुद्रांक शुल्काचे नुकसान झालेले नाही. तथापि, मिळकतीच्या चालू/अद्ययावत ७/१२ उताऱ्याची पाहणी न करता तसेच अद्ययावत ७/१२ उतारा दस्तासोबत जोडून न घेता, नोंदविला आहे. मिळकतीच्या चालू ७/१२ उताऱ्यात इतर हक्क सदरी "मा.आयुक्त पशुसंवर्धन यांचा ताबा असे शासनाच्या पूर्वपरवानगी शिवाय खरेदी विक्रीस बंदी" असा शेरा नमूद असूनही सदर दस्ताची नोंदणी केल्याने संबंधित दस्त नोंदविणाऱ्या प्रभारी दुय्यम निबंधक श्रीम.विद्या बडे (सांगळे), वरिष्ठ लिपिक यांना दिनांक १३/११/२०२५ रोजीच्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच सदर बाबत आयुक्त, पशुसंवर्धन यांनी संबंधितांवर दापोडी पोलीस ठाणे येथे एफआयआर नं. (FIR No.) ०३०८/२०२५, दिनांक १५/११/२०२५ अन्वये गुन्हा दाखल केला असून, त्यानुषंगाने पुढील पोलीस चौकशी चालू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील बोगस जात वैधता प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळविणाऱ्या कर्मचाऱ्यांची चौकशी करण्याबाबत

**(१०) * ७५५१ श्री.राजेश राठोड : तारांकित प्रश्न क्रमांक ५७३९ ला दिनांक ११ डिसेंबर, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा जिल्ह्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि अनुसूचित जातीचे बोगस जात प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्राच्या तक्रारीच्या अनुषंगाने नेमण्यात आलेल्या चौकशी समितीचा अहवाल महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांनी दिनांक २९ मे, २०२३ रोजी वा त्यादरम्यान शासनास सादर होऊनही त्यावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर चौकशीत तपासण्यात आलेल्या ५० जात वैधता प्रमाणपत्रांपैकी ४८ प्रमाणपत्रे बोगस असल्याचे निष्पन्न होऊनही व तसेच सदर प्रमाणपत्रे विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता दिल्याने दिनांक १ जुलै, २०२४ रोजीच्या ज्ञापनान्वये तत्कालीन उपायुक्त तथा सदस्य व तत्कालीन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती, बुलढाणा यांच्याविरूध्द एकत्रित विभागीय चौकशी करण्याबाबत आदेशित करूनही उक्त चौकशी सुरु करण्यात आली नाही तसेच चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही देखील करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून बोगस जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त केलेल्या संबंधित व्यक्तींविरुध्द तसेच सदर प्रकरणात दुर्लक्ष अथवा निष्काळजीपणा करणाऱ्या संबंधित यंत्रणेतील अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे खरे नाही.
(२) हे खरे नाही.

महाराष्ट्र अनुसूचित जाती अधिनियम, २००० व नियम, २०१२ मधील तरतुदींच्या अनुषंगाने विहित कार्यपध्दतीचा अवलंब न करता जात वैधता प्रमाणपत्र दिल्याप्रकरणी तत्कालीन उपायुक्त तथा सदस्य व तत्कालीन संशोधन अधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा जात पडताळणी समिती, बुलढाणा यांच्याविरूध्द या विभागाच्या दिनांक ०१/०७/२०२४ च्या ज्ञापनान्वये एकत्रित विभागीय चौकशी आदेशित करण्यात आली आहे. सदर अधिकाऱ्यांविरुध्द तयार करण्यात आलेल्या दोषारोपांची चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकारी व सादरकर्ता अधिकारी यांची शासन आदेश दिनांक १०/१२/२०२५ अन्वये नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच सदर अधिकाऱ्यांना शासन आदेश दिनांक ११/१२/२०२५ अन्वये निलंबित करण्यात आले आहे.
(३) महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग आणि विशेष मागासवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० मधील कलम ७ (२) मधील तरतुदीनुसार या अधिनियमान्वये पडताळणी समितीने दिलेला आदेश अंतिम असेल आणि याविरुध्द भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २२६ नुसार मा.उच्च न्यायालयाव्यतिरिक्त कोणत्याही प्राधिकरणासमोर किंवा न्यायालयामध्ये आव्हान देता येत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केळी उत्पादक शेतकऱ्यांसाठी सक्षम बाजारव्यवस्था निर्माण करून विपणन धोरणात सुधारणा करण्याबाबत

**(११)** * **७४९७ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **फलोत्पादन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात मागील काही वर्षांत केळी लागवडीखालील क्षेत्रात लक्षणीय वाढ होऊन सध्या हे क्षेत्र दीड लाख हेक्टरपेक्षा अधिक झालेले असून, बाजारातील मागणी, निर्यातक्षमता व हवामानातील अनुकूलता लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर केळी लागवड वाढविली असून केळी उत्पादनासाठी लागणाऱ्या खत, औषधे, मजुरी, सिंचन, वीज व वाहतूक यांसारख्या निविष्ठांच्या खर्चात झालेल्या मोठ्या वाढीमुळे सध्या एका एकरासाठी सरासरी १ ते १.५० लाख रुपये इतका उत्पादन खर्च येत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मागील काही महिन्यांत राज्यात सुरू निर्यातक्षम केळीसाठी प्रति किलो केवळ १० ते १५ रुपये, तर खोडवा केळीसाठी २ ते ५ रुपये इतकाच बाजारभाव मिळाल्यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही भरून येत नसल्याने केळी उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे आर्थिक नुकसान थांबविण्यासाठी शासनाने केळीला हमीभाव निश्चित करणे, विशेष बाजार हस्तक्षेप योजना राबविणे, शासकीय खरेदी केंद्रांची तातडीने उभारणी करणे तसेच निर्यात सुलभतेसाठी स्वतंत्र पॅकेज जाहीर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) होय.
(२) केळी पिकासाठी केंद्र शासनाने हमीभाव जाहीर केलेला नाही त्यामुळे त्याकरिता हमीभाव जाहीर करणे अथवा त्याकरिता शासकीय खरेदी केंद्र सुरु करणे अथवा सदर पीक नाशवंत असल्याने त्याकरिता विशेष बाजार हस्तक्षेप योजना राबविणे शक्य नाही.

केळीच्या निर्यात सुलभतेसाठी कृषि पणन मंडळामार्फत आंतरराष्ट्रीय बाजारपेठांच्या मागणीनुसार आवश्यक असलेली उच्च तंत्रज्ञानावर आधारित निर्यात सुविधा केंद्राची उभारणी करण्यात आली आहे तसेच पणन मंडळामार्फत निर्यातवृद्धीकरीता समुद्रमार्गे आंतरराष्ट्रीय वाहतुकीसाठी रक्कम रू.५०,०००/- प्रति कंटेनर अनुदान देण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अतिवृष्टी व पूरबाधित शेतकऱ्यांच्या मदतीसाठी ई-केवायसी विषयक व अन्य तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत

**(१२) * ६६१४ श्री.सुनिल शिंदे, डॉ. (श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील अतिवृष्टीसह पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने ३१ हजार ६२८ कोटींचे पॅकेज जाहीर करून निधीही उपलब्ध करून दिला असला तरी ई-केवायसीसह तांत्रिक कारणास्तव लाभ न घेऊ शकलेल्या ५ लाख ४२ हजार १४१ शेतकऱ्यांचे सुमारे १६५ कोटी ७२ रुपये शासनाकडे प्रलंबित असून त्यात मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या रुपये १६५ लाख इतक्या रकमेचाही समावेश असल्याची बाब दिनांक २१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात माहे ऑगस्ट ते ऑक्टोंबर, २०२५ या कालावधीत झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई व आपत्ती प्रतिसाद निधीसाठी राज्य शासनाने माहे डिसेंबर, २०२५ च्या पुरवणी मागण्यांमध्ये १५ हजार ६४८ कोटी रूपयांची तरतूद करून देखील अद्याप शेतकऱ्यांना मदत मिळाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने राज्यातील अतिवृष्टी व आपत्तीग्रस्त भागात पाहणी व पंचनामे करून नुकसान भरपाई, आर्थिक मदतीसाठी केंद्राला पाठवलेल्या प्रस्तावानंतर केंद्राकडून किती रक्कम मिळालेली आहे व मिळालेली सदर रक्कम किती शेतकऱ्यांना दिली वा देण्यात येत आहे,

(४) असल्यास, राज्यातील अतिवृष्टीसह पूरपरिस्थितीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याकरीता ई-केवायसी विषयक व अन्य तांत्रिक अडचणी दूर करण्याबाबत व सदरची रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) : (**१) अंशत: खरे आहे.
(२) राज्यात जून ते ऑक्टोंबर, २०२५ या कालावधीत झालेली अतिवृष्टी व पूर यामुळे शेतीपिकांचे, शेतजमिनींचे नुकसान व रब्बी हंगामासाठी बी-बियाणे व इतर आनुषंगीक बाबीकरीता शासनाने १ कोटी पेक्षा जास्त बाधित शेतकऱ्यांना त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात (DBT द्वारे) रुपये १५,५७६ कोटी इतकी मदत वितरीत केली आहे.
(३) राज्यात जून ते ऑक्टोंबर, २०२५ या कालावधीत झालेली अतिवृष्टी व पूरामुळे नुकसान झालेल्या आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळावी यासाठी केंद्रीय पथकाने पाहणी केली त्याचबरोबर क्षेत्रिय स्तरावर नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदतीसाठी केंद्र शासनास प्रस्ताव पाठविला. यानंतर राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण यांच्याद्वारे राज्यात Post Disaster Needs Assessment (PDNA) केंद्रीय पथक आले. त्यानुषंगाने अहवाल केंद्र शासनास सादर करण्याची कार्यवाही सुरू आहे.
(४) ज्या शेतकऱ्यांची अग्रीस्टेक मध्ये नोंदणी झालेली आहे अशा शेतकऱ्यांना ई-केवायसी मधून सुट देण्यात आली. ज्या शेतकऱ्यांची अग्रीस्टेक मध्ये नोंदणी नाही त्यांना प्रचलित पध्दतीने ई-केवायसी केल्यावर मदत वितरीत करण्यात येते. त्या शेतकऱ्यांची ई-केवायसी करण्याबाबत वेळोवेळी क्षेत्रिय स्तरावरून कॅम्प आयोजित केले.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही

-----------------

## मौजे करावे (नेरुळ) येथील अवैधरित्या खनिज मातीचे उत्खनन व वाहतूक प्रकरणी कारवाई करणेबाबत

**(१३)** * **७४८९ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे करावे येथील प्लॉट नं २७, नेरुळ सेक्टर ४२ या जमीन मिळकतीमध्ये अवैधरित्या एकूण २०१७ ब्रास खनिज माती उत्खनन व वाहतूक झाल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले असून उक्त मिळकतीमध्ये सन २०२२ पासून अवैधरित्या उत्खनन सुरु असून तहसिल कार्यालयातून परवानगी व त्याचे स्वामित्वधन (royalty) रक्कम भरणे बंधनकारक असतानाही सदरहू रक्कम न भरल्यामुळे रुपये १०६०० प्रति ब्रास दंडाने २ कोटी १५ लाख २५ हजार ४२४ रुपयांचा दंड तहसिलदार, ठाणे यांनी आकारला असूनही सदरहू दंड अद्यापही वसुल करण्यात आलेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०२५ मध्ये या मिळकतीवर बांधकाम करण्यात आलेले असून बांधकाम करणाऱ्या विकासकाकडून सदरहू दंड वसुल करण्यात आलेला नसल्यामुळे शासनाच्या महसुलातून प्राप्त होणाऱ्या रकमेचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नवी मुंबई महानगरपालिका व महसूल विभाग यांनी संयुक्तपणे दंडात्मक रक्कम वसुल न करता विकासकाला भोगवटा परवानगी दिल्यास याचा भविष्यात सदनिकाधारकांना भुर्दंड बसण्याची शक्यता आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन ठाणे, तहसिलदार यांनी आकारलेला २ कोटी १५ लाख २५ हजार ४२४ रुपयांचा दंड वसुल करण्याबाबत तसेच सदर वसुलीस विलंब करणाऱ्या संबंधित दोषींविरोधात शासन स्तरावरुन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.
(२) हे खरे नाही. दंड वसुलीची कार्यवाही सुरु आहे.
(३) सदर प्रकरणी जोपर्यंत शासनाच्या महसुलाची थकबाकी, जमीनीचे मालक व विकासक यांच्याकडून शासन जमा केली जात नाही, तोपर्यंत बांधकाम परवानगी स्थगीत करण्यांबाबत आयुक्त, नवी मुंबई महानगर पालीका यांना तहसिलदार, ठाणे यांनी कळविलेले आहे.
(४) मौजे करावे येथील प्लॉट नं. २७, नेरूळ, सेक्टर-४२ ही जमीन भूसंपादन केलेली असून सिडको हे नियोजन प्राधिकरण आहे. सिडको प्राधिकरणाने सदरचा प्लॉट हा मे. एक्सपिरीओ वेचर्स तर्फे भागीदार श्री.प्रतिक गिरीश छेडा यांना बांधकामासाठी वाटप केलेला असून त्यांना सदर जागेवर इमारत बांधकामासाठी सिडकोने परवानगी दिली असून सदर जागेवरती बांधकाम केलेले आहे.

या मिळतीमध्ये अवैधरित्या एकूण २०१७ ब्रास खनिज माती उत्खनन व वाहतूक झाल्याने सदर प्रकरणी सुनावणी घेवून रक्कम रूपये २,१५,२५,४२४/- रूपयांचा दंड आकारण्यात आलेला आहे. सदरची जमीन ही सिडको प्राधिकरणा करीता भूसंपादन झालेली असून भूखंड सदरी सदर यंत्रणेंचे नाव असल्याने दंडनिय आदेशाची नोंद भोगवटादार सदरी इतर हक्कात घेता येत नाही व बोजा ठेवता येत नाही. त्यामुळे सिडको प्राधिकारी यांना संबंधित प्लॉट दंडनिय रक्कमेच्या अनुषंगाने जप्त करून महसूल खात्याकडे वर्ग करण्याबाबतचे पत्र देण्यात आलेले आहे. तसेच प्रकरणी कसुरदार यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याबाबत पोलीस विभागाला पत्र देण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाच्या गैरवर्तणूक प्रकरणी कारवाई करण्याबाबत

**(१४) * ६७९४ श्री.सुधाकर अडबाले, श्री.जयंत आसगावकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जगप्रसिध्द ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोअर झोनमध्ये व्याघ्र प्रकल्पातील कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाने परवानगी नसतानाही ताडोबा येथे गाडी थांबवून फोटो आणि व्हिडिओ (रील) शूट केला असून, त्यामुळे वन्यजीव संरक्षण नियमांचे सर्रास उल्लंघन झाले असून सदर कर्मचाऱ्यास हटविण्याबाबत रिसॉर्ट / होम स्टे मालक यांनी वनविभागाकडे दिलेल्या तक्रारीत मागणी केल्याचे माहे जानेवारी, २०२६ च्या पहिल्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पर्यटकांच्या नियमबाह्य वर्तनामुळे वन्यजीव प्राण्यांच्या वावरावर परिणाम होत असून पर्यटकांच्या बेलगाम वृत्तीला रोखण्यासाठी प्राण्यांचे संरक्षण करण्यास असलेली यंत्रणा टाळाटाळ करीत असून नियमबाह्य काम करीत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पर्यटकांच्या बेलगाम वृत्तीबाबत वारंवार तक्रारी होऊनही सदर पर्यटन व्यवस्थापकावर कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसून कंत्राटी कर्मचाऱ्यांवर कोणतेही नियंत्रण नसल्याने याप्रकरणी पर्यटकांवर नियंत्रण ठेवण्यासंदर्भात तसेच संबंधित कर्मचाऱ्यांची चौकशी करुन कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे कंत्राटी पर्यटन व्यवस्थापकाचे विरुध्द रिसॉर्ट/होमस्टे मालकांची तक्रार प्राप्त झाली असता विभागीय वन अधिकारी, ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प यांचे मार्फत चौकशी करण्यात आली आहे. सदर चौकशीनुसार उक्त तक्रारीत तथ्य नसल्याची बाब प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य यांनी कळविली आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प प्रशासनामार्फत पर्यटन क्षेत्रात दिशादर्शक व सुचना दर्शक फलक लावण्यात आली असून आवश्यतेनुसार पर्यटक मार्गदर्शकांमार्फत वेळोवेळी पर्यटकांना घ्यावयाच्या खबरदारीबाबत मार्गदर्शन करण्यात येते.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धारणी (जि.अमरावती) तालुक्यातील गौण खनिजाच्या अति-उत्खननामुळे नद्यांचे नैसर्गिक प्रवाह नष्ट होत असल्याबाबत

**(१५) * ७६९६ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाटातील जीवनदायिनी म्हणून ओळख असलेल्या तापी, गडगा व सिपना या नद्यांचे पाणी शेतकऱ्यांसह पाळीव प्राणी आणि वन्य प्राण्यांसाठी अतिशय उपयुक्त असताना अलिकडच्या काळात मोठ्या प्रमाणात अवैधरित्या नदी-नाल्यांचे गौण खनिज उपसा करुन माती, रेती आणि दगड फोडून नैसर्गिक प्रवाह नष्ट करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मेळघाटातील नदीच्या पात्रातून गौण खनिज मिळविण्यासाठी नदीचे प्रवाह परिवर्तीत करुन जेसीबी आणि पोकलँडच्या माध्यमातून डोंगर खोदून पाणी वळविण्यात येत असून रस्त्यांची निर्मिती करण्यात येत असल्यामुळे नैसर्गिक प्रवाह बदलला जात असून दररोज दहा ते बारा फुट पाणी विसर्ग होत असल्याने काही दिवसातच तापी नदी कोरडी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणाची चौकशी करुन मेळघाटातील नदीच्या पात्रातून गौण खनिज मिळविण्यासाठी नदीचे प्रवाह परिवर्तीत करुन जेसीबी आणि पोकलँडच्या माध्यमातून डोंगर खोदून पाणी वळविण्यात येत असून रस्त्यांची निर्मिती करण्यात येत असल्यामुळे नैसर्गिक प्रवाह बदलला जात असून तसेच अवैधरित्या होत असलेले उत्खनन तात्काळ थांबविण्यासाठी शासनाने संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
(२) मेळघाटातील नदीच्या पात्रातून गौण खनिज मिळविण्यासाठी नदीचे प्रवाह परिवर्तीत करून जेसीबी आणि पोकलँडच्या माध्यमातून डोंगर खोदून पाणी वळविण्यात येत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) स्थानिक दैनिक वृत्तपत्रामध्ये दिनांक ०५ जानेवारी, २०२६ रोजी गौण खनिजाच्या बेसुमार उत्खननाने धारणीतील जलस्त्रोत असुरक्षित असल्याची बातमी प्रकाशित झाली होती. त्याअनुषंगाने सहायक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, धारणी यांनी बातमीची दखल घेत तहसिलदार, धारणी, मंडळ अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी यांच्या समवेत मोक्यावर जाऊन लिलाव झालेल्या तिन्ही रेतीघाटांवर भेट देऊन स्थळ पाहणी केली असता, धारणी तालुक्यातील मौजे सोनाबर्डी येथे लिलावामध्ये मंजूर झालेल्या घाटापर्यंत जाण्यासाठी लिलावधारक यांनी नियमानुसार कच्चा रस्ता तयार केला आहे. घाटधारकांनी घाटापर्यंत पोहचण्याकरीता कच्च्या रस्ता निर्माण करणे नियमानुसार अनुज्ञेय असून, सदर कच्चा रस्त्याव्यतिरीक्त लिलाव झालेल्या घाटावर जाण्यासाठी इतर कोणताही रस्ता उपलब्ध नाही. कोणताही नैसर्गिक प्रवाह नष्ट करण्यात आलेला नाही, कच्चा रस्ता तयार केल्याने पाण्याचा विसर्गामध्ये कोणताही बदल झाला नसल्याचे निर्देशनास आले आहे. नियमानुसार कच्चा रस्ता निर्मितीकरीता निर्बंध नसल्याने धारणी तालुक्यातील तापी, गडगा व सिपना नदीपात्रातील गौणखनिज उत्खननाबाबत सर्व प्रक्रिया कायदेशीर आणि तांत्रिक निकषांनुसारच सुरु असल्याचे निर्दशनास आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील सफारी आरक्षणातील गैरप्रकार रोखून प्रक्रियेत पारदर्शकता आणण्याबाबत

**(१६) * ७२३० श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पातील पर्यटन आरक्षणात 'स्थानिक कोट्या'चा गैरवापर करून बनावट आधारकार्डद्वारे शासनाची आणि स्थानिक पर्यटकांची फसवणूक करण्यात येत असल्याचा प्रकार माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आला असून मोहर्ली (कोअर) प्रवेशद्वारावर दिनांक २५ डिसेंबर, २०२५ रोजी पर्यटकांच्या कागदपत्रांची तपासणी केली असता, २३ पर्यटकांपैकी ९ पर्यटकांच्या आधारकार्डमधील छायाचित्र आणि माहितीमध्ये तफावत आढळली असून १० पर्यटकांनी ओळखपत्र दाखविण्यास नकार दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, काही दलाल (एजंट्स) स्थानिक नागरिकांच्या आधार क्रमांकांचा वापर करून बनावट ओळखपत्रांच्या आधारे बाहेरून येणाऱ्या पर्यटकांची नियमबाह्य बुकिंग करत असून, याद्वारे स्थानिक कोट्याच्या नियमांचे उल्लंघन आणि शासनाच्या महसुलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिनांक १९ डिसेंबर, २०२५ रोजी वेगवेगळया आयडीवरून एकूण ७ जिप्सींची (क्रुझर) अवैधरित्या नोंदणी करण्यात आली असून, या फसवणूक करणाऱ्यांविरुध्द दिनांक ३० डिसेंबर, २०२५ रोजी दुर्गापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, भविष्यात ऑनलाइन बुकिंग प्रक्रियेत होणारा गैरप्रकार रोखण्यासाठी व सफारी आरक्षणात सुधारणा होणेकरीता या संपूर्ण गैरप्रकाराची शासनाने चौकशी करून दोषी दलाल व व्यक्तींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या कोर क्षेत्रातील दिनांक २५/१२/२०२५ रोजीच्या क्रुझर सफारीतील पर्यटकांचे ओळखपत्रांची तपासणी केली असता ९ पैकी ७ पर्यटकांच्या ओळखपत्रात फेरबदल केलेला आढळून आल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन दुर्गापूर येथे तक्रार दाखल करण्यात आली आहे.

(४) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाची जिप्सी सफारीची व कुझर सफारीची बुकींग करण्यासाठी शासकीय संस्था NIC मार्फत वेबसाईट तयार करण्यात आलेली आहे.

प्रत्येक सफारी तिकीटावर QR Code असून सदर QR Code प्रवेश गेटवरील Scanner मशीनव्दारे Scan करून तिकीट खरे खोटे याची खात्री केल्यानंतर पर्यटकाचे आधारकार्ड तपासणी करुन पर्यटकांना आत सोडण्यात येते.

कुझर बुकींगसाठी स्वयंचलीत तिकीट मशीन लावण्यात आली असून त्यावर आधार OTP आधारीत बुकींग व्यवस्था तयार केलेली आहे. त्यामुळे स्थानिक व्यक्ती व्यतिरिक्त बाहेरील व्यक्ति/एजंट बुकींग करु शकत नाही. जिप्सी सफारी क्रुझर सफारी तिकीट, आधारकार्डची नियमीत तपासणी करण्यात येते. अनुचीत प्रकार आढळताच पोलीसात तक्रार दाखल करण्यात येते. तसेच जिप्सी सफारी संबंधित फेक बुकींग वेबसाईट विरुध्द पोलीसात या पुर्वीच तक्रार दाखल करण्यात आलेली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बॅकबे रिक्लेमेशनच्या सुधारित विकास आराखड्यातील प्रस्तावित ‘मरिना’ प्रकल्पास मच्छीमार संघटनांचा विरोध असल्याबाबत

**(१७) * ७०८६ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **उप मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने सादर केलेल्या बॅकबे रिक्लेमेशनच्या सुधारित विकास आराखड्यास राज्य शासनाने मान्यता दिली असून याअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या मरिना प्रकल्पाला विविध मच्छीमार संघटनांनी विरोध दर्शवुन आंदोलनाचा इशारा दिला असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मरीना प्रकल्प ज्या भागात उभारला जात आहे त्या ठिकाणी मच्छीमारांच्या चारशेहून अधिक बोटी उभ्या केल्या जात असून त्यावर हजारो मच्छीमारांचा उदरनिर्वाह होत असल्याने सदर प्रकल्पामुळे मच्छीमारांचे आर्थिक नुकसान होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राजभवन ते कफ परेड हा मच्छीमार बोटींचा भ्रमण मार्ग असून मरीना प्रकल्पामुळे दोन किलोमीटरच्या भ्रमणमार्गावर येणाऱ्या मोठ्या बोटी आणि मच्छीमारांच्या बोटींची कोंडी होत असतानाच कफ परेड कोळीवाड्यातील जागाही रस्त्याच्या रुंदीकरणात जाणार असल्याने पारंपारिक मच्छीमार व्यवसायावर त्याचा परिणाम होणार आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, मुंबईतील सर्व कोळीवाड्यांच्या सूचना व हरकतीचा संयुक्त समितीकडून अभ्यास करून याचा अहवाल शासनास प्राप्त झाल्यावर मरीना प्रकल्प राबविण्यात येऊन शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) बॅकबे रेक्लेमेशनच्या ब्लॉक III ते VI या अधिसूचित क्षेत्राच्या सुधारीत प्रारुप विकास योजनेस शासनाने मंजूरी दिली असून त्यासंबंधी शासन नगरविकास विभागाने महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६, चे कलम ३१(१) अन्वये अधिसूचना दिनांक १५/१२/२०२५ रोजी निर्गमित केली आहे. मंजूर विकास योजनेत "मरिना" प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ नुसार प्रारुप विकास योजनेवर जनतेच्या हरकती / सूचना मागविण्यासाठी दिनांक ७/१०/२०२५ रोजी सूचना प्रसिध्द करण्यात आली होती. एमएमआरडीएच्या अहवालानुसार मरिना प्रकल्पाबाबत स्थानिक मच्छीमारांच्या हरकती / सूचना प्राप्त झाल्या होत्या. सदर प्राप्त हरकती / सूचनांचे अनुषंगाने नियोजन समितीमार्फत संबंधितांना सुनावणी देण्यात आली. सदर सूचना / हरकती व त्यावरील नियोजन समितीची शिफारस इत्यादी विचारात घेऊन एमएमआरडीए ने सदरहु प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनास सादर करताना मरिनासह मंजूरीची शिफारस करण्यात आली होती. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार विकास योजनेसंबंधी कलम २३ ते कलम ३० मधील वैधानिक कार्यवाही पूर्ण झाल्यावर शासनाने कलम ३१(१) अन्वये विकास योजनेस मंजूरी दिली आहे.

(२) ते (३) कफ परेड बंदरात माहे जानेवारी, २०२६ अखेर यांत्रिक नौका २५९, बिगरयांत्रिक नौका २८ अशा एकूण २८७ नौका नोंदणीकृत आहेत. बॅकबे रिक्लेमेशन ब्लॉक III ते VI च्या विकास योजनेत मरिना सोबतच Water Transport Terminal असेही आरक्षण दर्शविले असून, सदरचे आरक्षण नौका उभ्या करण्याच्या वापराकरीता पुरक आहे.

सदर मरिना तसेच Water Transport Terminal यांचा भविष्यात विकास झाल्यानंतर मोठ्या प्रमाणात पर्यटन व पर्यटन पुरक सुविधा विकसित होणार आहेत. त्यामुळे वाहतुकीमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सदर बाब विचारात घेता, नेताजी सुभाषचंद्र बोस रस्ता व प्रकाश पेठे मार्ग यांना जोडणारा दुवा (link) रस्ता म्हणून देखील सदर रस्त्याचा उपयोग होणार आहे.

(४) बॅक –बे रिक्लेमेशनच्या ब्लॉक III ते VI या अधिसूचित क्षेत्राचे प्रारुप विकास योजनेच्या अनुषंगाने प्राप्त हरकती / सूचनावर नियोजन समितीमार्फत संबंधितांना सुनावणी देण्यात आली आहे. सदर सूचना / हरकती व त्यावरील नियोजन समितीची शिफारस इत्यादी सर्वंकषपणे विचारात घेऊन एमएमआरडीए ने उक्त अधिनियमाच्या कलम ३० अन्वये शासनास मंजूरीस्तव सादर केलेल्या प्रारुप विकास योजनेस शासनाने कलम ३१(१) अन्वये मंजूरी दिली आहे. त्यानुसार, महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियमातील तरतुदीनुसार विकास योजनेसंबंधी कलम २३ ते कलम ३० मधील वैधानिक कार्यवाही पूर्ण झालेवर शासनाने कलम ३१(१) अन्वये उक्त विकास योजनेस मंजूरी दिली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आहार भत्ता विलंबाने मिळत असल्याबाबत

**(१८) * ७५९० डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्यात आदिवासी विकास विभागामार्फत उभारलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राज्य शासनाकडून देण्यात येणारा आहार भत्ता दोन ते तीन महीने विलंबाने मिळत असल्याने वसतिगृहात

राहणाऱ्या विद्यार्थ्यांची गैरसोय होऊन उपासमारीची वेळ आल्याने या निषेधार्थ आदिवासी विद्यार्थी कृती समितीने अपर आयुक्त, आदिवासी विभाग, ठाणे कार्यालयावर दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान भीक मांगो आंदोलन केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना सुधारित दराने आहार भत्ता मिळावा या मागणीसाठी नवीन शासन निर्णय निर्गमीत करण्यात आला असून त्याची अंमलबजावणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना सुधारित दराने आहार भत्ता नियमित मिळणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे व यास जबाबदार असणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांचेविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.

वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित झाल्यानंतर वसतिगृह गृहपाल यांचेकडून सदर विद्यार्थ्यांस सायकल-१ अंतर्गत (माहे जून, जुलै व ऑगस्ट) शिफारस केल्यानुसार सदर विद्यार्थ्यांना वेळोवेळी डी.बी.टी. अदा करण्यात येते. त्यानुसार ऑनलाईन प्रणालीमध्ये प्रवेशित शिफारस केलेल्या विद्यार्थ्यांची डी.बी.टी. त्यांना अपर आयुक्त स्तरावरुन माहे जून,२०२५ मध्ये अदा करण्यात आलेली आहे.

शासन निर्णय दिनांक ०४/०७/२०२५ अन्वये आदिवासी मुला-मुलींच्या शासकीय वसतिगृहांत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या निर्वाह भत्ता, शैक्षणिक साहित्य खरेदी भत्ता व आहार भत्ता यामध्ये वाढ करण्यात आलेली आहे. सायकल ०१ चे पहिले देयक तयार करताना swayam.mahaonline.gov.in या पोर्टलवर महाआयटी कडून सुधारित दराने भत्ता अदा करण्याचा टॅब उपलब्ध नसल्याने सदरचे देयक जुन्या दराने विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खाती जमा करण्यात आलेले आहे.
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे कार्यालय येथे आदिवासी विद्यार्थ्यांनी दिनांक १५/०९/२०२५ रोजी आंदोलन केले होते. दिनांक ०४/०७/२०२५ च्या शासन निर्णयान्वये भत्त्यांमध्ये सुधारणा होऊनही जुन्या दराप्रमाणे सायकल १ व २ चे भत्ते जमा झाल्याने सुधारित दराने डीबीटी द्यावी, ही विद्यार्थ्यांची प्रमुख मागणी होती.

सुधारीत दराने भत्ता देण्याबाबत swayam.mahaonline.gov.in ह्या पोर्टलवर महाआयटी कडून ॲरिअर्स टॅब हा दिनांक १९/०९/२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्यानुसार सायकल ३ (डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी) विद्यार्थ्यांना वाढीव दराने मिळणेबाबत महाआयटी यांचेकडून आवश्यक बदल करण्यात आले असून विद्यार्थ्यांना आता सायकल ३ पासून वाढीव दराने अदा करण्यात येत आहे.

विद्यार्थ्यांची यापूर्वीच्या सायकल अंतर्गत थकबाकी रक्कम ऑनलाईन त्यांच्या आधार संलग्न खात्यावर अपर आयुक्त, नाशिक/ठाणे/अमरावती व नागपूर कार्यालयांकडून अदा करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील सर्व्हे क्र. १८३ व १८४ मधील जमिनींचे व्यवहार नोंदणीकृत नसलेबाबत

**(१९)** * **७४८१ श्री.सचिन अहिर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील सर्व्हे क्रमांक १८३ व १८४ मधील हिस्सा क्रमांक ६ बाबत जमीन मालक व मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि. यांचेमध्ये सन १९९१ मध्ये साठे करार करण्यात आलेला असून, सदरहू साठे करार नोंदणीकृत केल्यानंतर तीन वर्षांच्या कालावधीत खरेदी खत करून त्याबाबतचा नोंदणीकृत करार करणे आवश्यक असताना संबंधित विकासकाने सदर जमिनीबाबत कोणतेही खरेदी खत करून ते नोंदणीकृत केलेले नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपविभागीय अधिकारी, ठाणे (महसूल) यांनी विकासकाशी संगनमत करून सदरहू जागेच्या मालकी हस्तांतरणाबाबत खरेदी खत करून ते नोंदणीकृत करण्याकरीता बेकायदेशीरपणे सहाय्य केल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करुन पदाचा व अधिकाराचा स्वतःच्या आर्थिक लाभासाठी दुरुपयोग करून जमिनीच्या खरेदी प्रकरणी विकासकास सहाय्य करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द तसेच विकासकाविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) अ. ठाणे जिल्ह्यातील सर्व्हे क्रमांक १८३/३ क्षेत्र ११६२० चौ.मी. व १८४/६ क्षेत्र ३५२० चौ.मी. असे एकूण क्षेत्र १५१४० चौ.मी. या क्षेत्राचे साठेखत क्र.९१४६/१९९१ दिनांक ३१/१०/१९९१ रोजी सह दुय्यम निबंधक वर्ग-२ ठाणे क्र.१ येथे लिहून देणार श्री.सिताराम रामचंद्र पुर्णेकर व इतर आणि लिहून घेणार मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि. यांचेमध्ये साठेखत करार झालेला आहे.

ब. सह दुय्यम निबंधक ठाणे क्र.१२ या कार्यालयात मौजे कोलशेत सर्वे नं.१८३/३ क्षेत्र ११६२० चौ.मी., सर्वे नं.१८४/६ क्षेत्र ३५२० चौ.मी. असे एकूण क्षेत्र १५१४० चौ.मी. या मिळकतीचे खरेदीखत दस्त क्र.६८०८/२०२१ दिनांक २८/०६/२०२१ रोजी श्री.सिताराम रामचंद्र पुर्णेकर व इतर आणि लिहून घेणार मे.रोमा बिल्डर्स प्रा.लि. यांचेमध्ये नोंदणीकृत करण्यात आलेला आहे.

उपरोक्त साठेकरार क्र.९१४६/१९९१ मधील मिळकतीचे खरेदीखत दस्त क्र.६८०८/२०२१ अन्वये नोंदणी झालेले आहे. साठेखत नोंदणीकृत झाल्यानंतर त्यांचे खरेदी खताची नोंदणी करण्याकरीता कोणतीही कालमर्यादा नाही.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे ओवे (ता.पनवेल, जि.रायगड) येथील सिडकोच्या कोट्यवधी रुपयांच्या जमिनीच्या गैरव्यवहार प्रकरणी तहसिलदार यांचेवर कारवाई करण्याबाबत

**(२०) * ६९२५ ॲड.अनिल परब :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे ओवे (ता.पनवेल जि.रायगड) येथील स.न २४/४, १३१/१,१३१/ब व १३१/३ अ एकूण क्षेत्र १/०४/०० हे.आर मिळकत ही शासनाच्या (सिडको) मालकीची असताना अप्पर तहसिलदार यांनी आपल्या अधिकार क्षेत्राबाहेर जाऊन स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी खाजगी व्यक्तींना हाताशी धरुन शासनाची ३०० कोटी मुल्याची जमीन खाजगी व्यक्तींना देण्याबाबत आदेश पारित केल्याचे नुकतेच माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी श्री.बबन महादू भोईर व इतर यांनी दिनांक २७ सप्टेंबर, २०२३ रोजी वा त्यादरम्यान तहसिलदार, पनवेल यांच्याकडे सदर जमीन पुनर्दानीत करुन मिळण्याबाबत अर्ज केला होता, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अप्पर तहसिलदार यांनी जमिनीचा बेकायदेशीरपणे व्यवहार करणाऱ्याशी संगनमत करुन तहसिलदार पनवेल यांनी प्रकरण निकाली काढलेले असताना व सदरची जमीन शासनातर्फे सिडकोची असल्याचे स्पष्ट सिडकोचे अभिप्राय असताना शासनाचे सर्व नियम डावलून आर्थिक लाभापोटी शासनाची ३०० कोटींची जमीन खाजगी व्यक्तींना देण्याचा आदेश पारित केला आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असलेल्या अप्पर तहसिलदार व तहसिलदार पनवेल या दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

अपर तहसिलदार, पनवेल यांचेकडील दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या आदेशान्वये, मौजे ओवे (ता.पनवेल जि.रायगड) येथील स.न २४/४, १३१/१,१३१/४ब व १३१/३ अ एकूण क्षेत्र १/०४/०० हे. आर या मिळकती कै. नाना काथोड भोईर यांचे कायदेशीर वारसदार श्री.बबन महादू भोईर यांना पुनर्दानित करण्यात आली होती. तथापि, सदर प्रकरणी अपर जिल्हाधिकारी तथा मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन) यांचे अभिप्राय निदर्शनास आल्यानंतर अपर तहसिलदार, पनवेल यांचेकडील दिनांक १३/०५/२०२५ रोजीच्या सुधारित आदेशान्वये दिनांक ०९/०५/२०२५ रोजीच्या आदेशास स्थगिती देण्यात आलेली आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, कोंकण यांचे स्तरावर सह आयुक्त (पुनर्वसन) यांचे अध्यक्षतेखाली चौकशी समिती गठीत करण्यात आलेली आहे.

सदर चौकशी अहवाल प्राप्त झालेला असून तो तपासून १५ दिवसात पुढील कार्यवाही केली जाईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## काशीमिरा (जि.ठाणे) येथे अवैधरित्या गौण खनिज वाहतुकीवर कारवाई करणाऱ्या नायब तहसिलदार व त्यांच्या पथकावर हल्ला केल्याबाबत

**(२१) * ७२४८ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, अॅड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मिरा भाईंदर (जि.ठाणे) येथील काशीमिरा येथे अवैध गौण खनिज (वाळू) वाहतूक करणाऱ्या वाहनांवर कारवाई करण्यासाठी गेलेले नायब तहसिलदार आणि त्यांच्या पथकावर वाळू माफियांनी हल्ला केल्याची घटना घडल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारा निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी काशिगाव पोलीस ठाण्यात ७ अनोळखी व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित गुन्हेगारांना अटक करून त्यांच्यावर शासकीय कामात अडथळा आणून शासकीय कर्तव्य बजावणाऱ्या अधिकाऱ्यावर जीवघेणा हल्ला करणाऱ्यांवर कोणती कारवाई केली तसेच सदर घटनांची पुनरावृत्ती होऊ नये व महसूल अधिकाऱ्यांच्या सुरक्षिततेकरीता गस्त पथकाला पोलीस संरक्षण देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१), (२), (३) व (४) दिनांक २४/१२/२०२५ रोजी रात्री मौजे घोडबंदर येथे गौण खनिज कारवाईसाठी गस्त घालताना संबंधित नायब तहसिलदार यांना पाली हिल हॉटेल जवळ हे वाहन क्र. MH०४ / MG ७६८६ हे ८ ते ९ ब्रास रेती गौण खनिजाची अनधिकृत वाहतूक करत असल्याचे निदर्शनास आले. वाहन चालकास गौण खनिजाच्या वाहतूक परवानगी बाबत विचारणा केली असता वाहन क्र. MH०४ / LS७८६६ या कारमधून ४-५ इसमांनी उतरुन संबंधित नायब तहसिलदार यांना दमदाटी / धक्काबुकी करुन रेती वाहतूक करणारे वाहन दहिसर मार्गाने पुढे पळवून नेले.

संबंधित नायब तहसिलदार यांनी काशीगाव पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २३२, ११५(२), ३५१(२), ३५२ व ३ (५) अन्वये गुन्हा रजि क्र. ०५९०, दिनांक २४/१२/२०२५ रोजी ७ अनोळखी व्यक्तीवर गुन्हा दाखल केला आहे.

वाळू व इतर गौण खनिजांचे अनधिकृत उत्खनन, वापर व वाहतूक प्रकरणी विविध कायदे/अधिनियम/नियम यान्वये फौजदारी कारवाई करण्याबाबत दिनांक १७/०७/२०२५ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सूचना निर्गमित केल्या असून त्यानुसार क्षेत्रियस्तरावर कार्यवाही करण्यात येते.

-----------------

## मौजे बलगवडे (ता.तासगाव, जि.सांगली) येथे अवैधरित्या होणारी वृक्षतोड रोखण्याबाबत

**(२२) * ६९०६ श्री.अरुण लाड :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बलगवडे (ता.तासगांव, जि.सांगली) येथे गायरान हद्दीत ८.४१ हेक्टर क्षेत्रात खाजगी सौर ऊर्जा प्रकल्पाचे कामासाठी पोलिसांच्या बंदोबस्तात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड सुरू असल्याचे दिनांक २७ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले असून याठिकाणी ग्रामपंचायतीने सुमारे २० लाख खर्च करून गायरानात १५ हजार झाडे टँकरने पाणी घालून वाढविली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पाला सुरूवातीपासून स्थानिक ग्रामस्थांचा विरोध असून प्रशासनाला याबाबत वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत, आंदोलन आणि उपोषणही करण्यात आले आहे, स्थानिक लोकप्रतिनिधींच्या आश्वासनांनंतर हे उपोषण थांबविण्यात आले असून ग्रामपंचायत आणि ग्रामसभा यांचे ठराव करूनही प्रशासनाने याबाबत दखल घेतली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व चौकशीच्या अनुषंगाने स्थानिकांच्या होणाऱ्या सदर खाजगी सौरऊर्जा प्रकल्पाच्या व वृक्षतोडीच्या विरोधाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) याप्रकरणी जिल्हाधिकारी, सांगली यांच्या आदेशाप्रमाणे ८.४१ हे. आर क्षेत्रावरील वृक्षतोडीबाबत आवादा क्लेन कंपनी प्रोजेक्ट प्रा.लि.यांच्याकडून प्राप्त मागणीनुसार एकूण ५७५९ झाडांच्या तोडीस महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत (विनियमन) अधिनियम १९६४ मधील तरतुदीनुसार वनक्षेत्रपाल, रो.ह.यो. तासगांव यांचेकडील आदेश दिनांक १९/११/२०२५ अन्वये तसेच सुधारीत आदेश दिनांक १/१२/२०२५ अन्वये परवानगी देण्यात आलेली असून त्याच्या बदल्यात नवीन ५७५९ झाडांची लागवड करुन वाढविणे/संगोपन/पाणी घालण्याच्या अटी शर्तीनुसार वृक्षतोडीस परवानगी देण्यात आलेली आहे, असे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांच्या कार्यालयाकडून कळविण्यात आले आहे.
(२) व (३) बलगवडे वृक्ष बचाव समितीचे अध्यक्ष यांनी नोटीस दिलेली आहे. तथापि, शासनाच्या दिनांक २९/०४/२०२५ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घुलेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील साठवण तलावातून अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(२३)** * **६५९३ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) घुलेवाडी (ता.संगमनेर,जि.अहिल्यानगर) येथे जलजीवन मिशन अंतर्गत साठवण तलावाच्या खोदकामातून कोट्यवधी रुपयांच्या गौण खनिजाची (माती व मुरूम) अवैध वाहतूक महसूल विभागाने दुर्लक्ष केल्यामुळे सुरू असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या दोन वर्षांपासून तलावाच्या खोदकामातून मोठ्या प्रमाणावर गौण खनिज उपसा सुरू असूनही महसूल विभागाने रॉयल्टी व उपसा केलेल्या खनिजाची कोणतीही अधिकृत आकडेवारी उपलब्ध करून न दिल्याने शासनाच्या महसुलाचा मोठा अपव्यय व नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने घुलेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथील अवैध गौण खनिज वाहतुकीवर निर्बंध घालून दोषी अधिकाऱ्यांवर व ठेकेदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) घुलेवाडी (ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) येथे जलजीवन मिशन अंतर्गत साठवण तलावाच्या खोदकामातून निघालेल्या एकूण २५,१७८ ब्रास गौणखनिजासाठी संबंधित कंत्राटदाराने रुपये १,५०,६९,७१५/- इतकी स्वामित्वधनाची रक्कम शासन जमा केली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर बजेट हॉटेल्स उभारण्यासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याबाबत

**(२४) * ७८०१ श्री.पंकज भुजबळ, श्री.अमोल मिटकरी, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक येथील सन २०२७ च्या सिंहस्थ कुंभमेळयाकरीता सुमारे ५ कोटी भाविक येण्याची शक्यता असल्याने व त्यांच्या निवासाकरीता येथील हॉटेल्स आणि भक्तनिवासांची संख्या अपुरी पडणार असल्याने, भाविकांची वाजवी दरात जेवण, मूलभूत सोयीसह निवासाची उत्तम सोय होण्याच्या दृष्टीने 'आयआरसीटीसी'ला (IRCTC) ३ व ४ स्टार दर्जाची बजेट हॉटेल्स विकसित करण्याकरीता जमीन उपलब्ध करून देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे केली असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संचालक, आयआरसीटीसी (वित्त) यांनी दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी व लोकप्रतिनिधींनी दिनांक ४ जुलै, २०२५ रोजी वा त्यादरम्यान यासंदर्भात शासनाकडे पत्रव्यवहार करूनही तसेच महसूल व वन विभागाने दिनांक २२ डिसेंबर, २०२४ रोजी वा त्यादरम्यान जिल्हाधिकारी, नाशिक यांना जागा निश्चितीचे निर्देश दिले असतानाही अद्याप याबाबत पुढे कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, माहे ऑगस्ट-सप्टेंबर, २०२७ या कालावधीत होणाऱ्या सिंहस्थ कुंभ अमृत स्नानासाठी येणाऱ्या भाविकांच्या निवासाची सोय व्हावी याकरीता आयआरसीटीसीला तात्काळ जागा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३) व (४) डिव्हिजनल रेल्वे मॅनेजर, सेंट्रल रेल्वे भूसावळ डिव्हीजन यांना दिनांक १/१/२०२५ व इतर पत्रान्वये बजेट हॉटेल करीता http://nashik.nic.in/htmldocs/govt land.html या लॅन्ड डेटा बँक संकेतस्थळावरुन नाशिक जिल्ह्यातील आवश्यक जागेची निवड करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

अद्यापपर्यंत आय.आर.सी.टी.सी. कडून सुलभ जागेची निवड करण्यात आलेली नाही. आय.आर.सी.टी.सी. कडून बजेट हॉटेल तयार करण्यासाठी सुलभ शासकीय जागा मागणी कळविल्यानंतर जागा वितरीत करणेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात आली आहे.

-----------------

## राज्यातील वनक्षेत्रांमधील वणव्यांच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबवण्याबाबत

**(२५) * ८२७७ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यामध्ये दिनांक १ जानेवारी ते १५ एप्रिल, २०२५ या साडेतीन महिन्यांच्या कालावधीत छोट्या-मोठ्या अशा १ हजार २१५ वणवे लागल्याच्या घटना घडल्याचे माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाने प्रसिध्द केलेल्या अहवालात जंगलांना आगी लागण्याच्या देशभरात ११ हजारांवर घटना घडल्याचे नमूद केले असून, त्यापैकी महाराष्ट्रात ९७ मोठ्या,१ हजार किरकोळ तर एप्रिल महिन्यात ११८ आगी लागल्याचे नमूद करण्यात आले असून, विविध कारणांनी दिवसेंदिवस वनक्षेत्र कमी होत असताना सातत्याने लागणाऱ्या आगींमूळे वनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असून याचा परिणाम जैवविविधतेवर होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने वणवा लागण्याच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी तसेच वणव्यांमुळे नष्ट होणाऱ्या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण करण्यासाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) नोंदविन्यात आलेले गुन्हे यानुसार, नमूद कालावधीत राज्यातील विविध वनक्षेत्रांत वणव्याच्या एकूण ९६०१ घटनांची नोंद झाली आहे.

(२) फारेस्ट सर्हे ऑफ इंडियाने (FSI) ने प्रसिध्द केलेल्या अहवालानुसार, राज्यात माहे एप्रिल २०२५ या कालावधीमध्ये एकूण ३४८ मोठ्या वनवणव्याच्या Fire Alerts प्राप्त झाल्या होत्या, या घटनांबाबत वनगुन्हा नोंदविण्यात आलेला असून त्यावर तत्परतेने कार्यवाही करण्यात आलेली आहे. एप्रिल महिना हा पानगळीचा आणि उष्णतेचा काळ असल्याने आगीच्या घटनांमध्ये वाढ दिसून येते. सदर वनवणव्याचे स्वरुप प्रामुख्याने ग्राउंड फायर प्रकारातील असून त्यामध्ये मुख्यतः कोरडे गवत व पालापाचोळा जळण्याच्या घटना आढळून आलेल्या आहेत.

(३) वणवा लागण्याच्या घटनांना प्रतिबंध घालण्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात:- वनविभागात जंगलात आग लागण्याच्या घटना रोखण्याकरीता अग्निरक्षकाची नेमणूक, वणवा प्रतिबंधक पथके (Crew Station) स्थापन करण्यात येतात व जाळरेषा घेण्यात येतात.

वनवृत्त स्तरावर, विभागीय स्तरावर तसेच वनपरिक्षेत्र स्तरावर वनवणवा नियंत्रण कक्ष स्थापन केले जातात. जंगलामध्ये आग लागल्याची माहीती SMS व्दारे तात्काळ प्राप्त करण्यासाठी विभागीय स्तरावरील व क्षेत्रिय स्तरावर अधिकारी/कर्मचारी यांचे फॉरेस्ट सर्व्हे ऑफ इंडियाच्या संकेतस्थळावर नोंदणी करण्यात येते.

लोकांकडून वनक्षेत्रातील वणव्यांची, अवैध घटनांची माहिती/तक्रार प्राप्त होण्यासाठी हॅलो फॉरेस्ट ही हेल्प लाईन सेवा टोल फ्री क्र. १९२६ कार्यान्वित आहे. वणव्यांना प्रतिबंध करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात अस्तित्वात असलेल्या कायद्यामधील तरतुदीनुसार कारवाई केली जाते, तसेच वनगुन्हे नोंद करुन चौकशी करण्यात येत आहे. वनवणव्यांच्या घटनांवर तत्परतेने कारवाई करण्यात येत असून वेळीच वनवणवे आटोक्यात आणण्याबाबतचे प्रयत्न करण्यात येतात.

वनवणवा लागू नये याकरीता याची खबरदारी घेण्याबाबत गावपातळीवर जनजागृती कार्यक्रम राबवून, भिंतीपत्रके लावून तसेच रात्रगस्त कार्यक्रम राबविण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सामाजिक न्याय विभागाच्या विविध आर्थिक विकास महामंडळांना कर्जपुरवठा उपलब्ध करून देण्याबाबत

**(२६) * ६७०१ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, अॅड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या विविध आर्थिक विकास महामंडळांना केंद्र शासनाकडून सुमारे २५० कोटी रुपयांचा कर्जपुरवठा प्राप्त झालेला नसल्याची बाब माहे जानेवारी २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाच्या 'NSFDC' व 'NSKFDC' या संस्थांनी पुढील निधी देण्यास नकार दिल्यामुळे राज्यातील अनुसूचित जाती, नवबौध्द व सफाई कर्मचारी समाजातील हजारो सुशिक्षित बेरोजगारांचे स्वयंरोजगारासाठीचे कर्ज प्रस्ताव प्रलंबित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सन २०१९ मध्ये दिलेल्या शासन हमीची मुदत २०२४ मध्ये संपल्याने व नवीन कर्जवाटपावर मर्यादा आल्याने शासकीय योजनांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण होत असून महामंडळांचा उद्देश साध्य होत नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व ७५० कोटी रुपयांच्या नवीन शासन हमीबाबत केंद्र शासनाकडे पाठपुरावा व उपाययोजना करण्यासंदर्भात तसेच लाभार्थ्यांना वेळेवर कर्ज उपलब्ध करून देण्यासाठी शासन कर्जवाटप धोरणात व शासन हमीच्या प्रक्रियेत काही विशेष सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) होय हे अंशत: खरे आहे,

राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी) व राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (एन.एस.के.एफ.डी.सी) नवी दिल्ली या दोन केंद्रीय महामंडळांकडे सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारीत असलेल्या महामंडळांची विविध योजनांतर्गत कर्ज प्रकरणे प्रलंबित आहेत.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही. दिनांक २२-०८-२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळास रुपये १०० कोटी, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळास रुपये ६०० कोटी, व संत रोहीदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळास रुपये ५० कोटींची खंड हमी मंजूर करण्यात आलेली आहे.

(४) दिनांक २२-०८-२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये विभागांतर्गत कार्यरत महामंडळांना शासन हमी मंजूर करण्यात आली असल्याने राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त आणि विकास महामंडळ (एन.एस.एफ.डी.सी) व राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त आणि विकास महामंडळ (एन.एस.के.एफ.डी.सी) नवी दिल्ली या केंद्रीय महामंडळांमध्ये व राज्य शासनामध्ये हमीबाबतचे (Deed of Guarantee) संमती करार करण्याची प्रक्रिया सध्या सुरू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर शहरातील विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा थकीत निधी वितरित करण्याबाबत

**(२७)** * **७९५८ श्री.संदीप जोशी, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना ही महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राबवली जाणारी एक महत्त्वाची योजना असून, या योजनेचा मुख्य उद्देश अनुसूचित जाती (SC) आणि नवबौध्द प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांना शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही, त्यांना शहरात राहून उच्च शिक्षण घेता यावे यासाठी थेट आर्थिक मदत करणे हा असून देखील नागपूर शहरातील इयत्ता ११ वी ते पदवी पर्यंतच्या ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृह उपलब्ध झाले नाही अशा अनेक विद्यार्थ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत दिली जाणारी आर्थिक मदत अद्याप मिळाली नसल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना इयत्ता ११ वी ते पदवी पर्यंत शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौध्द प्रवर्गातील गरजू विद्यार्थ्यांना सन २०१६-१७ पासून लागू करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सन २०२४-२५ या वर्षामध्ये पात्र ठरलेल्या उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.संजय शिरसाट :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) नागपूर जिल्ह्यातील स्वाधार योजनेकरीता सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता रुपये ११.९६ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून २३४६ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात आतापर्यंत रुपये १४.५१ कोटी इतका निधी वितरीत करण्यात आला असून मागील वर्षाचे प्रलंबित व या वर्षात नव्याने प्राप्त झालेल्या एकूण २८४६ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे.तसेच स्वाधार योजनेकरीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता रुपये ४००.०० कोटी इतका

पुरेसा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आलेला आहे, त्यामधून एकूण ३००१९ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. तसेच या आर्थिक वर्षात विद्यार्थ्यांचे स्वाधार योजनेच्या प्राप्त अर्जांची तपासणी करून पात्र विद्यार्थ्यांना योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही सुरू आहे.

(४) लागू नाही.

-----------------

## नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या रेती उपसा होत असल्याबाबत

**(२८) * ६७९० श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातून वाळू माफियांकडून अवैधरित्या रेती उपसा सुरु असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवापूर बंधाऱ्यात मोठ-मोठी इंजिने, महाकाय बोटी दिसून येत असून अवैधरित्या शेकडो ब्रास वाळू उपसली जात असतानाही महसूल विभाग व पोलीस प्रशासनाचे त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रातून अवैधरित्या वाळू उपसा करणाऱ्यांवर व त्यांना पाठिशी घालणाऱ्या महसूल अधिकारी व पोलीस प्रशासनावर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) अशी बाब निदर्शनास आलेली नाही.

तथापि, मौजा वासरी, मौजा शंकतीर्थ व मौजा महाटी या गोदावरी नदीपात्रामध्ये वाळू उपसा होत असल्याचे निदर्शनास आले.

(३) माहे. एपिल, २०२५ ते माहे. जानेवारी, २०२६ या कालावधीत महसूल विभागाकडून नांदेड जिल्ह्यातील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उपसा व वाहतूक प्रकरणी एकूण ३७७ दंडात्मक कारवाई करून रूपये ३४३ लाख वसूल करण्यात येवून १७२ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर माहे डिसेंबर, २०२५ मध्ये नांदेड जिल्ह्यात अवैध वाळू उपसा प्रकरणी पोलीस विभागाने एकूण ३९ गुन्हे दाखल केलेले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## बुलढाणा व लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांचे वन्यप्राण्यांमुळे होणारे नुकसान रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(२९) * ७५६९ श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती चित्रा वाघ :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर, खामगाव व जळगाव जामोद तालुक्यातील (जि.बुलढाणा) तसेच शिरूर अनंतपाळ तालुक्यातील (जि.लातूर) रब्बी हंगामात बहरलेल्या पिकांचे नीलगाय रानडुक्कर व वानर यासारख्या वन्यप्राण्यांमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास सातपुडा पर्वतरांगा लगत असलेल्या गावांत वन्य प्राण्यांचा मोठ्या प्रमाणात वावर असल्याने जंगलातून बाहेर येणारे वन्यप्राणी थेट शेत पिकात येत असल्याने याबाबत शेतकऱ्यांनी वारंवार तक्रारी करूनही वन विभागाकडून याची दखल घेतली जात नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव, जळगाव जामोद या तालुक्यातील व मेहकर तालुक्यातील जानेफळ, घाटबोरी, देऊळगाव साकर्शा, हिवरा खुर्द परिसरातील लातूर जिल्ह्यातील शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ, डिगोळ, लक्कडजवळगा, आरी, थेरगाव, कांबळगा, गणेशवाडी, हिप्पळगाव, तळेगाव बोरी या परिसरातील आणि सातपुडा पर्वत रांगा लगत असलेल्या गावातील शेत पिके वाचवण्यासाठी शासनाने तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू शेतकऱ्यांच्या शेत पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासंदर्भात तसेच रानडुक्कर व वानर यासारख्या वन्यप्राण्यांचा वावर रोखण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१), (२) व (३) बुलढाणा वन विभागातील मेहकर, खामगाव व जळगाव जामोद तालुक्यामध्ये दिनांक २५/१२/२०२५ ते दिनांक ३१/१२/२०२५ या कालावधीत वन्यप्राण्यांमुळे पीक नुकसान झाल्याचे ४९२ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी ३८५ प्रकरणी १२.६४५ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली असून उर्वरित २९ प्रकरणी प्रचलित नियमातील तरतुदींची पुर्तता झाल्यानंतर नुकसान भरपाई अदा करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

धाराशिव वन विभागातील लातूर जिल्ह्यातील शिरुर अनंतपाळ तालूक्यामध्ये सन २०२५-२६ (दिनांक ०९/०१/२०२६ अखेर पर्यंत) वन्यप्राण्यांमुळे पीक नुकसान झाल्याची ३४ प्रकरणी प्रचलित नियमातील तरतुदीनुसार रुपये १.०३ लक्ष इतकी नुकसान भरपाई अदा करण्यात आली आहे.

वन्यप्राण्यांनी नुकसान केल्याची तक्रार प्राप्त झाल्यास क्षेत्रियस्तरावरील गस्तीपथकाद्वारे वन्यप्राण्यांना जंगल क्षेत्रात परत पाठविण्याची कार्यवाही करण्यात येते.

महाराष्ट्र वन्य प्राण्यामुळे झालेली हानी, इजा किंवा नुकसान यांकरीता नुकसान भरपाई प्रदान करणे अधिनियम, २०२३ या कायद्यातील तरतुदीनुसार मृतांच्या कायदेशीर वारसास व नुकसानग्रस्त व्यक्तीस नुकसान भरपाई अदा करण्यात येते.

नुकसान भरपाई तात्काळ अदा करण्याकरीता अर्थसंकल्प निधी वितरण प्रणालीवर २४०६ २३६६ या लेखाशिर्षांतर्गत उणे (-) प्राअधिकाराची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(४) दिनांक २२/०७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये शेतपिकास धोकादायक ठरलेल्या रानडुक्कर व रोही या वन्यप्राण्यांना पारध करण्याची परवानगी देण्यात येते. तसेच दिनांक २५/११/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील मानव वन्यजीव संघर्षग्रस्त माकडे (Rhesus Macaque) / वानर

(Semnopithecus entellus) यांना बचावकरीता पकडणे व अधिवासात सोडणे याकरीता कार्यप्रणाली सुनिश्चित करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील कृषी विभागाच्या जिल्हानिहाय कापूस खरेदीतील चुकीच्या आकडेवारीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(३०) * ६८४८ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी विभागाने जिल्हा पीक कापणी प्रयोगाच्या संकलन वहीतील नोंदीचा अभ्यास न करता पिकांची उत्पादकता आकडेवारीच्या आधारे तसेच पीक कापणी प्रयोग आणि सांख्यिकी विभागाच्या आकड्यानुसार जाहीर करुन केंद्र शासनास कळविलेल्या आकडेवारीमध्ये फार मोठी तफावत असल्याचे माहे ऑक्टोबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील कृषी विभागाच्या उक्त चुकीच्या आकडेवारीच्या आधारे केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्रालय व सीसीआयने जिल्हयांची कापूस खरेदी मर्यादा निश्चित केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू तालुकानिहाय सरासरी उत्पादकता लक्षात घेता त्यामध्ये असलेली तफावत विचारात न घेता जिल्ह्याची एकूण उत्पादकता लक्षात घेऊन जिल्हानिहाय प्रतिहेक्टर कापसाची उत्पादकता विचारात घेतल्यामुळे सीसीआयव्दारा कापूस खरेदीत शेतकऱ्यांचे फार मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदरहू उत्पादकता कमाल उत्पादकता म्हणून ग्राहय धरण्याबाबत शेतकऱ्यांनी शासनाकडे वेळोवेळी केलेली मागणी विचारात घेऊन केंद्र व राज्य शासनाने निर्णय घेण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली तसेच केंद्र शासनास उक्त चुकीची आकडेवारी कळविणाऱ्या कृषी विभागातील संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१), (२) व (३) प्रचलित पध्दतीनुसार भारतीय कापूस महामंडळास (CCI) कापूस पिकाची सरासरी उत्पादकता जिल्हास्तरावरून दिली जात होती. परंतु या वर्षी भारतीय कापूस महामंडळाने (CCI), उत्पादकता राज्य स्तरावरुन निश्चित करणेबाबत सूचना निर्गमित केल्या आहेत. राज्यस्तरावरुन, उत्पादकता ही महसूल मंडळामध्ये घेतलेल्या एकूण १२ पीक कापणी प्रयोगांवर अधारीत असते. सदर पीक कापणी प्रयोग हे रॅण्डम पध्दतीने निवडलेल्या कापूस पिकाच्या प्लॉटमधून घेण्यात येतात.

यामध्ये उत्तम तसेच अत्यंत कमी उत्पादन असलेल्या कापूस पिकाच्या प्लॉटचा समावेश असतो. या वस्तुस्थितीचा विचार करता, परिपत्रकामध्ये पीक कापणी प्रयोगातील उच्चतम उत्पादकता असलेले २५ टक्के पीक कापणी प्रयोगातील उत्पादनानुसार जिल्हानिहाय प्रति हेक्टरी सुधारीत उत्पादकता निश्चित करण्यात आली होती.

वरीलप्रमाणे उत्पादकता कळविल्यानंतरही प्रगतशिल शेतकरी व लोकप्रतिनिधींकडून त्यांनी खरेदी केंद्रावर यापेक्षा अधिक उत्पादकता असलेले शेतकरी यांचे उत्पादन घेवून आले असल्याची बाब निर्दशनास आणून देण्यात आली आहे

CCI धोरणानुसार, जर एखाद्या शेतकऱ्याचे उत्पादन जास्त असेल तर निर्धारित प्रक्रियेनुसार अतिरिक्त उत्पादन देखील खरेदी केले जाते. त्यामुळे शेतकरी त्यांच्या संपूर्ण उत्पादनाची विक्री करण्यापासून वंचित राहत नाहीत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक येथील आदिवासी विकास उपायुक्त यांनी 'प्रकल्प अधिकारी' पदावर असताना केलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करणेबाबत

**(३१) * ७७२१ श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उपायुक्त, आदिवासी विकास (जि.नाशिक) येथील अधिकाऱ्यावर ते पूर्वी प्रकल्प अधिकारी पदावर कार्यरत असताना गैरव्यवहार केल्याबाबत गुन्हा नोंद झाला असून शासकीय सेवेत रुजू होण्यापूर्वी देखील त्यांच्यावर कळवण पोलीस स्टेशनमध्ये गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असतानाही त्याकडे दुर्लक्ष करीत २ वेळा नियम डावलून त्यांना पदोन्नती देण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एकलव्य निवासी शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सहावा व सातवा वेतन आयोग लागू करणे, शिक्षकांच्या बदल्या, नियुक्त्या आयोगाकडून परिविक्षाधीन कालावधीतील वेतन फरक मिळणे तसेच प्रलंबित देयके मंजूर करणे याबाबत प्रति शिक्षक कर्मचाऱ्यांकडून एक लाख रुपये याप्रामणे रक्कम घेतल्याप्रकरणी सदरहू उपायुक्त व त्यांच्या अधिनस्त कार्यरत सहाय्यक आयुक्त, लिपिक यांच्याविरुध्द लाचलुचपत विभागाकडे तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**प्रा.डॉ. अशोक उईके :** (१) आदिवासी विकास आयुक्तालयामध्ये एकूण तीन उप आयुक्त कार्यरत असून यापैकी एक उपायुक्त यांचेसंदर्भात ते शासकीय सेवेत रुजु होण्यापुर्वी सन २०१० साली त्यांचे कौटुंबिक मिळकतीच्या वादासंबंधाने पोलीस स्टेशन सटाणा, जि.नाशिक येथे गुन्हा दाखल होता.सदर प्रकरण निकाली निघाले आहे. सदर उपायुक्त, प्रकल्प अधिकारी या पदावर असताना त्यांचेवर गुन्हा दाखल नाही. सदर उपायुक्त यांना नियमांतील तरतूदीनुसार व विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करुन दिनांक १०/०७/२०२३ च्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे.

(२) व (३) संबंधित उपायुक्त व त्यांच्या अधिनस्त कार्यरत सहाय्यक आयुक्त, लिपिक यांच्याविरुध्द लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रारी प्राप्त झाल्या असून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिनांक ०५/१२/२०२५ रोजीच्या पत्रान्वये सदर तक्रारी पुढील उचित कार्यवाहीस्तव शासनास सादर केल्या आहेत.

याअनुषंगाने, आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांना चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.एकलव्य निवासी शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन फरक अदा करण्यात आलेला नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे तळोधी (जि.चंद्रपूर) येथे अवैधरित्या मुरूमाचे उत्खनन होत असल्याबाबत

**(३२) * ७१०० श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) तळोधी (जि.चंद्रपूर) गावापासून काही अंतरावरील ठिकाणावरुन मुरुमाची तस्करी करून ट्रॅक्टर व टिप्परद्वारे अवैधरित्या विनापरवाना वाहतूक केली जात असून, अपर तळोधी तहसिल कार्यालयामार्फत कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्यामुळे तस्करी करणाऱ्यांची मनमानी वाढल्याचे माहे डिसेंबर, २०२५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तळोधी (जि.चंद्रपूर) येथे मुरुमाची तस्करी होत असताना महसूल व पोलीस विभागाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याने शासनाने उपरोक्त प्रकरणाची चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने तळोधी गावच्या परिसरात मुरुमाची तस्करी करणाऱ्या कंपनीविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.
प्राप्त अहवालानुसार याबाबत कोणतीही लेखी तक्रार जिल्हाधिकारी कार्यालयास, क्षेत्रिय कार्यालयास व पोलीस विभागास प्राप्त झालेली नाही.
(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
जिल्ह्यात तालुका स्तरावर भरारी पथकाची निर्मीती करण्यात आलेली असून अवैध उत्खनन व वाहतूक प्रकरणात वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार सन २०२५-२६ या आर्थीक वर्षात माहे ३१ जानेवारी २०२६ पर्यंत अवैध उत्खन व वाहतूक प्रकरणात एकूण ३५६ प्रकरणांत कार्यवाही करण्यात आलेली आहे व त्यातुन एकूण रक्कम ४२८.०२ लाख दंड वसुल करण्यात आलेला आहे व एकूण ५३ गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे व ३५६ वाहने जप्त करण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांच्या झालेल्या पीक नुकसानीची पाहणी करुन पीक विमा भरपाई मिळण्याबाबत

**(३३) * ७४६० श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील, श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावदा मंडळातील (ता.रावेर,जि.जळगांव) केळी उत्पादक शेतकऱ्यांनी सन २०२४ मध्ये काढलेल्या हवामान आधारित फळ पीक विम्याची रक्कम नियमानुसार दिनांक १५ सप्टेंबर, २०२५ पर्यंत त्यांच्या खात्यात जमा होणे अपेक्षित असताना सावदा मंडळातील शेतकऱ्यांना सदर विम्याची रक्कम मिळाली नसल्याची बाब दिनांक १३ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मराठवाड्यात चालू हंगामात पीक विमा अंतर्गत नुकसानग्रस्त शेतकऱ्यांकडून किती दावे दाखल झाले असून, त्यापैकी किती दावे निकाली काढण्यात आले असून नाकारण्यात आलेल्या व प्रलंबित असलेल्या दाव्यांची संख्या जास्त आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये प्रधानमंत्री पीकविमा योजनेंतर्गत ३ लाख २९ हजार ३९९ शेतकऱ्यांनी सुमारे २ लाख ४९ हजार हेक्टर क्षेत्रासाठी पीकविमा उतरविला असून, त्यासाठी शेतकऱ्यांकडून तसेच केंद्र व राज्य शासनाकडून मिळून सुमारे १५२ कोटी २ लाख रुपये विमा हप्ता विमा कंपन्यांना अदा करण्यात आले असतानाही संबंधित शेतकऱ्यांच्या पिकांचे अतिवृष्टी, पूर, पाणी साचणे व पिके वाहून जाणे यामुळे झालेली नुकसानभरपाई देताना पीक कापणी प्रयोग आधारित चार निकष सक्तीने लागू केल्यामुळे प्रत्यक्ष नुकसान झालेल्या अनेक शेतकऱ्यांना विमा संरक्षणाचा लाभ नाकारण्यात आल्याच्या तक्रारी शासनाकडे करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त तक्रारींच्या अनुषंगाने सोलापूर जिल्ह्यातील पीकविम्याचा हप्ता भरूनही नुकसानभरपाई न मिळालेल्या ३ लाख २९ हजार ३९९ शेतकऱ्यांना प्रत्यक्ष नुकसानीवर आधारित विशेष पुनर्तपासणी, पर्यायी निकषांनुसार नुकसानभरपाई मंजूर करून संबंधित विमा कंपन्यांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबत व सावदा, उधळी, तांदलवाडी यासह परिसरातील बाधित शेतकऱ्यांना व्याजासह विमा भरपाई मिळवून देण्यासंदर्भात शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) पुनर्रचित हवामान आधारित फळपीक विमा योजनेंतर्गत आंबिया बहार सन २०२४-२५ मध्ये सावदा महसूल मंडळातील १६२२ नुकसान पात्र शेतकऱ्यांना रक्कम रुपये ११,०७,२६२७८/- कोटी इतकी नुकसान भरपाई निश्चित झाली आहे.

याबाबतची मागणी भारतीय कृषी विमा कंपनीकडून माहे नोव्हेंबर, २०२५ अखेर प्राप्त झाली असून, त्यानुषंगाने निधी वितरीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(२) हे खरे नाही.

राज्यात खरीप हंगाम २०२५ पासून उत्पादनावर आधारीत सुधारीत प्रधानमंत्री पीक विमा योजना राबविण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत मराठवाड्यात खरीप हंगाम २०२५ मध्ये एकूण ५३.४६ लाख विमा अर्जांद्वारे शेतकऱ्यांनी या योजनेत सहभाग नोंदवला आहे. सद्य:स्थितीत पीक उत्पादनाची माहिती संकलीत करण्याची कार्यवाही सुरु असून त्यानुसार पिकांच्या उत्पादनातील घटीच्या प्रमाणात नुकसान भरपाई लागू होणार आहे.
(३) व (४) खरीप, २०१६ पासून केंद्र शासनाने, "प्रधानमंत्री पीक विमा योजना" सुरु केली. त्यास अनुसरुन राज्यात देखील सदर योजना खरीप हंगाम, २०१६ पासून राबविण्यात येत आहे.

या योजनेबाबत केंद्र शासनाने, विहित केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार "पीक कापणी प्रयोग" यावर आधारित उत्पादनातील येणाऱ्या घटीच्या आधारे नुकसान भरपाई ही जोखीम बाब अनिवार्य होती. तर अतिरिक्त ४ जोखीम बाबी या अनिवार्य नव्हत्या. राज्य शासनास अतिरिक्त ४ पैकी कोणत्याही जोखीम बाबींसहित किंवा विरहीत विमा योजना राबविण्याचे स्वातंत्र्य होते. मात्र, राज्याने अनिवार्य तसेच अनिवार्य नसलेल्या अतिरिक्त ४ जोखीम बाबींचा समावेश करुन नुकसान भरपाई देण्याचे निश्चित केले होते.

मात्र, या सर्व जोखीम बाबींचा समावेश करुन सदर योजना लागू केल्यानंतर, विशेषत: १ रुपयात पीक विमा योजना सुरु झाल्यावर, योजनेचा अयोग्य प्रकारे लाभ घेण्याच्या प्रवृत्तीत वाढ होऊन, मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असल्याचे शासनाच्या निदर्शनास आले. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने अनिवार्य केलेल्या पीक कापणी प्रयोगावर आधारित नुकसान भरपाई देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून, त्यानुसार सन २०२५-२६ पासून सुधारित पीक विमा योजना राबविण्यात येत आहे.

सदर सुधारित पीक विमा योजनेंतर्गत सोलापूर जिल्ह्यात खरीप हंगाम, २०२५ मध्ये ३.३२ लाख विमा पात्र अर्जांद्वारे शेतकऱ्यांनी सुमारे २.५१ लाख हेक्टर क्षेत्राकरीता पीक विमा घेतला आहे. त्यानुसार केंद्र व राज्य शासन यांच्याकडून एकूण रुपये १५१.१७ कोटी इतका विमा हप्ता भारतीय कृषी विमा कंपनींस उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

मात्र, योजनेच्या कार्यपध्दतीनुसार, सद्य:स्थितीत पीक उत्पादनाची माहिती संकलीत करण्याची कार्यवाही सुरु असून, त्यानुसार पिकांच्या उत्पादनातील घटीच्या प्रमाणात नुकसान भरपाई लागू होणार आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिकच्या सारूळ व राजूर डोंगररांगांमधील अनधिकृत खाणपट्ट्यांच्या उत्खननावर कारवाई करण्याबाबत

**(३४)** * **६६४२ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिकच्या सारूळ आणि राजूर डोंगररांगांमध्ये महसूल विभागाकडून केवळ १५ खाणपट्ट्यांना उत्खननाची परवानगी देण्यात आली असताना नियमांचे उल्लंघन करून प्रत्यक्षात तब्बल ५५ ठिकाणी डोंगरफोडी सुरू असल्याने शासनाचे दररोज कोट्यवधी रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत असून वाढत असलेल्या अवैध उत्खननामुळे पर्यावरणाचीही हानी होत असल्याची बाब दिनांक २७ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले आहे व त्यानुषंगाने नाशिकच्या सारूळ आणि राजूर डोंगररांगांमध्ये शासन नियमांचे उल्लंघन करुन अनधिकृत उत्खनन करणाऱ्यांवर तसेच अवैध उत्खननास सहकार्य करणाऱ्या संबंधित शासकीय अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (**१) व (२) नाशिक तालूक्यातील मौजे सारुळ व राजुर बहुला परिसरातील डोंगर रांगामध्ये अवैध उत्खनन होत असल्याबाबत महाराष्ट्र टाईम्स या दैनिक वृतपत्रात दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५ रोजी बातमी प्रसिध्द झाली होती.

सदर परिसरात १७ खाणपट्टे मंजूर करण्यात आले आहेत. तसेच १६ व्यक्तींना ३३,१०० ब्रास गौण खनिज उत्खननासाठी तात्पुरते परवाने देण्यात आले होते.

नाशिक तालुक्यातील सारुळ व राजुर बहुला परिसरासह अन्य ठिकाणी अनधिकृत उत्खनन व वाहतूकीच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक कारवाई करण्याच्या दृष्टीने मंडळ अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली २४ तास स्थायी पथक तयार करण्यात आले आहेत.

मंडळ अधिकारी, महिरावणी व ग्राम महसूल अधिकारी सारुळ यांनी दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रसिध्द झालेल्या वृत्ताच्या अनुषंगाने सारुळ परिसरात पाहणी करुन १२ व्यक्तींनी गौणखनिज उत्खननाचा कोणताही प्रकारचा परवाना नसताना १२ ठिकाणी अनधिकृतरित्या दगड उत्खनन केल्याबाबतचा अहवाल तहसिलदार यांना सादर केला होता.सदर अहवालानुसार तहसिलदार यांनी सदर व्यक्तींविरुध्द शासन परिपत्रक दिनांक १७ जुलै २०२५ अन्वये वाडीवऱ्हे पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.०२८५/२०२५ अन्वये फौजदारी गुन्हा दाखल करुन संबंधितांना रक्कम रुपये ३३,७१,६२६/- च्या दंडात्मक नोटीसा दिल्या आहेत.

तसेच, नाशिक तालुक्यात सुरु असलेल्या खाणपट्टांची ETS मोजणी केली असून त्यानुसार संबंधित खाणपट्टाधारकांकडून भरण्यात आलेले स्वामित्वधन व मोजनीचे परिमाण यामध्ये आलेल्या तफावतीनुसार स्वामित्वधन जमा करण्याबाबत संबंधितांना नोटीसा बजावल्या आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पश्चिम विदर्भातील आत्महत्यांग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत करण्याबाबत

**(३५) * ७७३४ श्री.संजय खोडके : तारांकित प्रश्न क्रमांक २७०२ ला दिनांक १ जुलै, २०२५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) पश्चिम विदर्भात सन २०२५ मध्ये २००९ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या असून यामध्ये यवतमाळ जिल्ह्यात ४४६,अमरावतीमध्ये ३९६,अकोल्यामध्ये ३८८,बुलढाण्यामध्ये ३४६, वर्ध्यामध्ये २२४ आणि वाशिममध्ये २१२ शेतकऱ्यांनी आत्महत्या केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आत्महत्या करणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये तरुण शेतकरी व दुसऱ्याच्या शेतात काम करणारे शेतकरी असून त्यांच्याकडे अधिकृत कागदपत्रे नसल्यामुळे व खर्चापेक्षा कमी उत्पन्न शेतीत प्राप्त होत असल्यामुळे आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटूंबियांना मदत करण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.मकरंद जाधव (पाटील) : (**१) हे अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) प्रचलित धोरणानुसार शेतकऱ्यांच्या आत्महत्या रुपये १.०० लक्ष इतकी मदत आत्महत्याग्रस्त शेतकऱ्याच्या वारसांना देण्यात प्रकरणी येते.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मांडा-टिटवाळा (ता.कल्याण, जि.ठाणे) येथील विद्यामंदिर शाळेजवळील रस्ता पुन्हा सुरू करण्याबाबत

**(३६) * ७२५० श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांडा-टिटवाळा पूर्वेकडील (ता.कल्याण, जि.ठाणे) विद्यामंदिर शाळेजवळील रस्त्याच्या जागेवर वन विभागाने आपला दावा केला असून अनधिकृत बांधकामे वाढत असल्याने वन जमिनी संरक्षित करण्यासाठी हा रस्ता बंद केल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्ता सुमारे ४०० कुटुंबांसाठी आवश्यक असून या रस्त्याद्वारे रुग्णवाहिका, अग्निशमन दलाची वाहने, पाणी टँकर आणि कचरा संकलन करणारी वाहने ये-जा करीत असल्याने स्थानिकांनी वन विभागाकडे सदरहू रस्ता पूर्णपणे बंद न करता वाहतुकीसाठी नियंत्रित पध्दतीने खुला करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने उपरोक्त प्रकरणी चौकशी करुन चौकशीच्या अनुषंगाने सदरहू नागरिकांच्या मागणीसंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक :** (१) मौजे मांडा, ता.कल्याण जि.ठाणे येथील विद्यामंदिर शाळेजवळील सर्वे क्र.६४/१ क्षेत्र वन विभागाच्या ताब्यात असून ७/१२ सदरी फॉरेस्ट डेपो म्हणून नोंद आहे. सदर क्षेत्रावर क्षेत्रिय वनकर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम सुरु असल्यामुळे स्थानिकांच्या रहदारीवर तात्पुरता परिणाम झाला होता. सद्य:स्थितीत सदरचे जागेस कोणतेही कंपाऊंड नसून स्थानिक या क्षेत्रातून पायी ये-जा करीत आहेत.

(२) व (३) याबाबत स्थानिकांनी दिनांक १९/१२/२०२५ रोजी वनक्षेत्रपाल, कल्याण यांना अर्ज केला आहे. तथापि, सदर वन विभागाच्या क्षेत्रात रस्ता अस्तित्वात नसून रस्ता मंजूरीबाबतचा कोणताही प्रस्ताव शासकीय यंत्रणेकडून वन विभागाकडे प्राप्त झालेला नाही.

सद्य:स्थितीत स्थानिकांची पायी रहदारी सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील खत कंपन्यांकडून विक्रेते यांची अडवणूक करण्यात येत असल्याबाबत

**(३७) * ६९१० श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात रब्बी हंगामासाठी पेरण्यांना वेग आला असतानाच पेरणी झालेल्या गहू-मका-ज्वारीसाठी खतांची पहिली मात्रा देण्यासाठी युरिया खताच्या मागणीत वाढ झाली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली असून बाजारात युरिया खताचा तुटवडा नसतानाही युरिया खतासोबत अन्य खते,औषधे आणि सूक्ष्म अन्नद्रव्यांसह लिंकिंग केले जात असल्याने २६० रुपयाचे युरिया खत इतर औषधांसह ६०० रुपयांवर जात असल्याने राज्यभरातील शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खत कंपन्याकडून विक्रेते शेतकरी यांना वेठीस धरण्यात येत असल्याने अशा खत कंपन्यांवर तात्काळ कारवाई करून शेतकऱ्यांना मागेल तितके युरिया खत २६० रुपये दराने उपलब्ध करून देण्यासाठी तसेच युरिया खत विक्रीमध्ये होणारा गैरव्यवहार रोखण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) नाही.
(२) राज्यात युरीया खताच्या मागणीनुसार खताचा पुरवठा करण्यात आला आहे. रब्बी हंगाम जानेवारी २०२६ मध्ये ११.८४ मे.टन युरीया खताचा साठा उपलब्ध आहे. राज्यात खतांच्या विक्रीमध्ये होणारा गैरव्यवहार रोखण्यासाठी गुणनियंत्रण निरीक्षकांमार्फत नियमितपणे तपासणी केली जाते. त्याच सोबत खतांच्या गैरव्यवहार व लिंकींग संदर्भात येणाऱ्या तक्रारींवर गठीत केलेल्या ४४ भरारी पथकामार्फत तपासणी केली जाते. खताची लिंकींग रोखण्यासाठी विक्रेते व उत्पादक यांना वेळोवेळी सूचना करण्यात येतात तसेच यासंदर्भात दुकानाच्या दर्शनी भागात फलक लावण्यात आले आहेत. तसेच खतावरील लिंकींग व गैरव्यवहाराबाबत खत (नियंत्रण) आदेश १९८५ व अत्यावश्यक वस्तु अधिनियम १९५५ नुसार कारवाई करण्यात येते. दिनांक ०४/०८/२०२५ ते दिनांक २६/०९/२०२५ या कालावधीत क्षेत्रियस्तरावर मोहिम स्वरुन ePOS प्रणालीवर असलेल्या युरीया खताच्या प्रत्यक्ष साठ्याची तपसणी केली असून तपासणीमध्ये दोषी आढळून आलेल्या ५३४ कृषी सेवा केंद्राचे परवाने निलंबित केले असून ६१ किरकोळ खत विक्रेत्यांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही

-----------------

## अहिल्यानगर जिल्ह्यातील रोहयो मजुरांची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करून प्रलंबित मानधन वितरित करण्याबाबत

**(३८)** * **८०७४ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना ही केंद्र शासनाची एक महत्त्वाची योजना असून जिचा मुख्य उद्देश ग्रामीण भागातील कुटुंबांना आर्थिक सुरक्षा प्रदान करणे आणि ‘कामाच्या अधिकारा’ची कायदेशीर हमी देणे हा असून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील (रोहयो) (जि.अहिल्यानगर) ३ लाख ३४ हजार सक्रिय मजुरांपैकी ४२ टक्के मजुरांची फेस ई-केवायसी प्रक्रिया अद्याप पूर्ण झालेली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली असून केंद्र शासनाने मजुरांची उपस्थिती आणि मजुरी देयकांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी फेस ई-केवायसी अनिवार्य केली असून, ही प्रक्रिया पूर्ण न झाल्यामुळे मजुरांची उपस्थिती नोंदवण्यास व त्यांना वेळेवर मानधन मिळण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्ह्यात केवळ १ लाख ९५ हजार ८१ मजुरांचेच ई-केवायसी पूर्ण झाले असून तांत्रिक सहाय्यक व रोजगार सेवकांकडून पाठपुरावा होऊनही तांत्रिक अडचणींमुळे उर्वरित मजुर या प्रक्रियेपासून वंचित राहिल्याने शासकीय योजनेच्या अंमलबजावणीच्या प्रक्रियेस विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्या अनुषंगाने उर्वरित मजुरांची उपस्थिती नोंदवुन त्यांना वेळेवर मानधन मिळण्यासंदर्भात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.भरत गोगावले :** (१) हे खरे नाही.

अहिल्यानगर जिल्हामध्ये एकूण ३,४५,१८७ त्यापैकी २,५५,४७१ मजुरांची ई-केवायसी पूर्ण झालेल्या मजुरांची टक्केवारी एकूण मजुर संख्येच्या ७४.१३ टक्के आहे.
(२) हे खरे नाही.
(३) प्रकिया सुरू असल्याने चौकशी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) लागू नाही.

-----------------

## पाचुंदा वनपरिमंडळ व कुपाटी येथील जंगलातील वृक्षतोड रोखण्याबाबत

**(३९) * ६७५३ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माहूर वनपरिक्षेत्र कार्यालय अंतर्गत पाचुंदा वनपरिमंडळामध्ये व कुपाटी येथील जंगलामध्ये गेल्या चार-पाच महिन्यांपासून सागवानासह इतर झाडांची मोठ्या प्रमाणात अवैधरित्या कत्तल सुरु असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, संबंधित वनपाल, वनरक्षक हे शासनाने बांधलेल्या निवासस्थानामध्ये राहत नसून तालुक्याच्या ठिकाणी राहून आपले कर्तव्य बजावत असल्यामुळे जंगलामध्ये अवैध वृक्षतोड सुरु आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने उक्त प्रकरणी चौकशी करुन अवैध वृक्षतोड करणाऱ्या माफियांवर तसेच कर्तव्यात कसुर करणाऱ्या संबंधित अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गणेश नाईक : (**१) सदर प्रकरणी अवैध वृक्षतोड प्रतिबंध कायद्याच्या अनुषंगाने होत असलेल्या विविध उपाययोजनामुळे अशा पक्रारची बाब निदर्शनास आली नसल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), नागपूर यांनी कळविले आहे.
(२) नियतक्षेत्र कुपाटी येथे वनरक्षक यांना शासकीय निवासस्थान नाही. तसेच वनपाल पाचोंदा येथील निवासस्थान नादुरुस्त असल्याकारणाने संबंधित कर्मचारी वनपरिक्षेत्र मुख्यालयी राहतात. सदर वनकर्मचारी नियमितपणे गस्ती करत असल्यामुळे अवैध वृक्षतोड झाली नसल्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (संरक्षण), नागपूर यांनी कळविले आहे. तथापि, अवैध वृक्षतोडी प्रकरणामध्ये आरोपींना पकडणे व त्यांच्यावर नियमानुसार वनगुन्हे नोंदविण्याची कारवाई करण्यात येत आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

## मोखाडा (जि.पालघर) तालुक्यातील शेतकऱ्याने नायब तहसिलदारांच्या दालनात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याबाबत

**(४०) * ७२५१ श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्री.सदाशिव खोत, श्री.संजय केणेकर, श्रीमती उमा खापरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात वडिलोपार्जित जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर खोट्या पध्दतीने नावे नोंदविण्यात येऊन जमिनी हडप करण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मोखाडा तालुक्यातील (जि.पालघर) शेतकऱ्याने जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर खोटी नावे नोंदवण्यात आल्याचा आरोप करत मोखाडा तहसिल कार्यालयात नायब तहसिलदारांच्या दालनात आत्मदहनाचा प्रयत्न केल्याची घटना माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने या संपूर्ण घटनेची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व चौकशीच्या अनुषंगाने सदर शेतकऱ्याच्या आत्मदहनाचा प्रयत्न करण्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित दोषींविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे : (**१), (२), (३) व (४) मौजे-खोच, ता.मोखाडा, जि.पालघर येथील १) गट क्र.८३, क्षेत्र १३-९३-२० हे.आर पो.ख.१-९८-० हे.आर. एकूण क्षेत्र १५-९१-२० हे.आर. २) गट क्र.१००, क्षेत्र १-१२-१० हे.आर पो.ख.०-०५-८ हे.आर. एकूण क्षेत्र १-१७-९० हे.आर ३) गट क्र.१०३, क्षेत्र ०-४९-६० हे.आर.पो.ख.०-०४-० हे.आर एकूण क्षेत्र ०-५३-६० हे.आर ह्या मिळकतीच्या अनुषंगाने खातेदार श्री.सोमी जेठ्या मालक यांचे मृत्यूपश्चात श्री.तुकाराम चैतु मालक यांनी मा.दिवाणी न्यायालय जव्हार यांचेकडील वारस प्रमाणपत्र दिनांक ३१/०१/२०२४ च्या आधारे वारस नोंदी घेण्याबाबत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने फेरफार क्रमांक ५९९, दिनांक १२/०२/२०२४ नोंदविण्यात आला असून कै. सोमी जेठ्या मालक यांचे वारस म्हणून १) तुकाराम चैतू मालक २) अशोक चैतू मालक यांची नावे दाखल केली आहेत. सदर फेरफार नोंदविल्यानंतर १५ दिवसांच्या मुदतीत हितसंबंधितांनी हरकत घेतली नसल्यामुळे सदरचा फेरफार हा दिनांक ०६/०३/२०२४ रोजी मंडळ अधिकारी यांनी मंजूर केला आहे.

तथापि, सदर फेरफार हा खोटे दस्तावेज तयार करुन घेण्यात आलेला असून त्याअनुषंगाने मंडळ अधिकारी व ग्राम महसूल यांची चौकशी करावी व संबंधितांची नावे कमी करावी अन्यथा कुटुंबासमवेत आत्मदहन करणार असल्याचे श्री.राजु भाऊ मालक यांचे निवेदन तहसिलदार मोखाडा यांचेकडे प्राप्त झाले होते. सदर निवेदनाचे अनुषंगाने श्री.राजु भाऊ मालक यांना तहसिलदार मोखाडा कार्यालयात दिनांक १७/१२/२०२५ रोजी चर्चेकरीता बोलाविण्यात आले होते, मात्र ते उपस्थित राहीले नाहीत. तद्नंतर दिनांक ३०/१२/२०२५ रोजी अचानक नायब तहसिलदार यांचे दालनात श्री.राजू मालक यांनी आत्मदहनाचा प्रयत्न केला होता.

तद्नंतर दिनांक ०१/०१/२०२६, दिनांक०५/०१/२०२६, १२/०१/२०२६ व दिनांक २२/०१/२०२६ रोजी झालेल्या चर्चेदरम्यान तहसिलदार व नायब तहसिलदार यांनी महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये सदर फेरफार रद्द करण्याच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी जव्हार विभाग जव्हार यांचेकडे अपील दाखल करावे तसेच वारस प्रमाणपत्र रद्द ठरविण्याबाबत सक्षम प्राधिकारी यांचेकडे अपील दाखल करणेबाबत अर्जदार यांना सूचित करून त्यांना आवश्यक कायदेशीर मदत उपलब्ध करून देण्याचे आश्वासनही देण्यात आले होते.

तद्नंतर पुनश्च दिनांक २३/०१/२०२६ रोजी सहायक जिल्हाधिकारी जव्हार विभाग जव्हार यांचे दालनात झालेल्या चर्चेदरम्यान अपील दाखल केल्यानंतर लवकरात लवकर निर्णय देण्याच्या आश्वासनानंतर आत्मदहनाबाबतचे आंदोलन मागे घेत असल्याबाबतचा लेखी अर्ज निवेदनकर्ता यांनी दिलेला आहे.

सद्य:स्थितीत अर्जदार श्री.राजु भाऊ मालक यांनी सहायक जिल्हाधिकारी, जव्हार विभाग, जव्हार यांचे न्यायालयात फेरफार क्रमांक ५९९ रद्द करणेबाबत महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपिल दाखल केले आहे. सदर अपिलाची दिनांक २८/०१/२०२६ व दिनांक ११/०२/२०२६ रोजी सुनावणी झाली असून पुढील सुनावणी दिनांक २५/०२/२०२६ रोजी ठेवण्यात आली आहे.

प्रस्तुत प्रकरणी अर्जदार श्री.राजु भाऊ मालक यांनी दाखल केलेल्या अपीलाच्या अनुषंगाने लवकरात लवकर सुनावणी घेऊन सदर प्रकरण निकाली काढण्याचे तसेच सदर प्रकरणाची सविस्तर चौकशी करून संबंधितांवर नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश शासन पत्र दिनांक १४/०२/२०२६ अन्वये जिल्हाधिकारी पालघर यांना देण्यात आले आहेत.

-----------------

## राज्यातील विविध कृषी योजनांकरीता मंजूर निधी वितरीत करण्याबाबत

**(४१) * ७१५९ श्री.अरुण लाड, डॉ.परिणय फुके, श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या सन २०२४-२५ च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार सकल उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा ८.७ % असून या क्षेत्रासाठी करण्यात आलेली तरतूद आणि वितरित करण्यात आलेला निधी यात तफावत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास आली असून राज्य पुरस्कृत योजनांसाठी मागील आठ महिन्यात ७४४२ कोटी १३ लाख रुपयांच्या निधीपैकी केवळ ३६९ कोटी ५४ रुपये खर्च करण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अतिवृष्टीने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना पीक विमा आणि अन्य योजनांसाठी राज्याबरोबरच केंद्रांनी ही पुरेसा निधी दिला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाकडे पुरेसा निधी उपलब्ध नसल्यामुळे शेतकऱ्यांसाठी राबविण्यात येणाऱ्या कृषी यांत्रिकीकरण, सिंचन, फलोत्पादन तसेच अन्य कृषी पूरक योजनांचा लाभ अनेक शेतकऱ्यांना मिळाला नसून सन २०२१-२२ ते २०२४-२५ या चार वर्षाच्या कालावधीत राज्यभरातून ५६.१७ लाख शेतकऱ्यांनी या योजनांसाठी अर्ज केले मात्र त्यापैकी केवळ १८.४६ लाख शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळाला तर सुमारे ३८ लाखाहून अधिक शेतकरी या योजनेपासून वंचित राहिले तसेच शासनाने आवश्यक

असलेल्या ४४,६३७ कोटी रुपयांच्या निधीच्या तुलनेत केवळ ६,५२१.४० कोटी रुपयांचेच अनुदान वितरित केल्यामुळे राज्यातील लाखो पात्र शतकऱ्यांना आर्थिक अडचणीचा सामना करावा लागत असून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी ४६.७० लाख संभाव्य लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असताना, निधीच्या उपलब्धतेअभावी त्याची प्रत्यक्षात अंमलबजावणी होत नाही आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन राज्यातील शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती उत्पादन क्षमता वाढविता यावी या उद्देशाने कृषी विभागाच्या सर्वच योजनांना पुरेशा प्रमाणात महाराष्ट्र व केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी वितरित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दत्तात्रय भरणे :** (१) हे खरे नाही.

माहे डिसेंबर, २०२५ च्या पहिल्या आठवड्यात राज्य पुरस्कृत योजनांसाठी मागील आठ महिन्यांत ८०९८.४१ कोटी रुपयांच्या निधीपैकी रुपये २८०९.८३ कोटी रुपये खर्च करण्यात आले आहेत. सध्या रुपये ३०५२.६१ कोटी खर्च करण्यात आले आहेत.
(२) हे खरे नाही. योजनांसाठी राज्याबरोबरच केंद्र शासनाने पुरेसा निधी उपलब्ध करुन दिला आहे.
(३) हे खरे नाही, सन २०२१-२२ ते सन २०२४-२५ या कालावधीत ५६.१७ लाख लाभार्थ्यांची निवड केली आहे. त्यापैकी दिनांक ३०/११/२०२५ रोजीपर्यंत १८.४६ लाख पात्र लाभार्थी अर्जांना रुपये ६५२१.४० कोटी वितरीत केले आहेत. तदनंतर दिनांक ०१/१२/२०२५ पासून आजपर्यंत ९,००० लाभार्थ्यांना रुपये ४७.७७ कोटी वितरीत केले आहेत. महाडीबीटी पोर्टलवर प्राप्त अर्जांकरीता संपृक्तता मोडवर निधी उपलब्धता करुन देण्यासाठी रुपये ४४,६३७ कोटींची आवश्यकता आहे. तथापि, अर्ज केलेले सर्वच शेतकरी पात्र ठरत नाहीत किंवा प्रत्यक्षात लाभ घेत नाहीत. त्यामुळे ४९.७१ लाख लाभार्थ्यांची "प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य" या तत्त्वानुसार प्रक्रियेद्वारे निवड झालेली असून रुपये ३३४९.१८ कोटींची देयके अपलोड केली असून अनुदान वितरणाची कार्यवाही सुरू आहे.
(४) कृषी विभागाच्या सर्वच योजनांना पुरेशा प्रमाणात महाराष्ट्र व केंद्र शासनाने मंजूर केलेला निधी संबंधितांकडून पाठपुरावा करुन प्राप्त करुन वितरित करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.